# सृजनरंग

अंक – ७

ऑक्टोबर २०२४



राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष : सृजनरंग : अंक – ७


- **प्रवर्तक** : शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, महाराष्ट्र शासन
- **प्रेरणा** : **मा. आय. ए. कुंदन,** (भा.प्र.से.)
  प्रधान सचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई.
- **मार्गदर्शक** : **मा. सूरज मांढरे,** (भा.प्र.से.)
  आयुक्त (शिक्षण), महाराष्ट्र राज्य, पुणे.
- **प्रकाशक** : **राहूल रेखावार,** (भा.प्र.से.)
  संचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **संपादक** : **रमाकांत काठमोरे**
  सहसंचालक, राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **कार्यकारी संपादक** : **डॉ. दिपक माळी**
  उपविभाग प्रमुख, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

  **डॉ. अजयकुमार फुंदे**
  अधिव्याख्याता, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.
- **निर्मिती समन्वयक** : **सुनीता काटम**
  विषय सहायक, आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष.
- **तज्ज्ञ समिती** : **डॉ. संदीप पवार**
  वरिष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, सिंधुदुर्ग.

  **राणी पाटील**
  अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, कोल्हापूर.

  **संदीप वाकचौरे**
  उपशिक्षक, जि. प. प्राथ. शाळा कोंची, ता. संगमनेर, जि. अहमदनगर तथा राज्य अभ्यासगट सदस्य

  **सुवर्णा पवार**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथ. शाळा आर्वी, ता. हवेली, जि. पुणे तथा राज्य अभ्यासगट सदस्य, गणित.

  **वैशाली शेवाळे**
  विषय साधनव्यक्ती URC, औंध मनपा.

  **पूजा जाधव**
  उपशिक्षिका, जि. प. प्राथमिक शाळा गिरीम, ता. दौंड, जि. पुणे.
- **मुखपृष्ठ रचना** : **नीताली हरगुडे** (कला शिक्षिका, सरिता विद्यालय, पुणे.)
- **मलपृष्ठ रचना** : **विवेकानंद पाटील** (कलासाम्राज्यम्, पुणे.)
- **अंक ७** : ऑक्टोबर २०२४
- **मुद्रक** : रुना ग्राफिक्स, पुणे.

# सृजनरंग

अंक - ७

## आंतरराष्ट्रीय गुणवत्ता कक्ष




ज्ञानसेवा तु साफल्यम्

राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.

## प्रस्तावना

शिक्षक मित्रांनो,

शिक्षण म्हणजे केवळ वर्गात दिले जाणारे पाठ्यपुस्तकांतील अनुभव नाहीत, तर त्या पलीकडे शिक्षणाचा मूलभूत विचार रुजवण्याची प्रक्रिया आहे. आपल्या अवतीभोवती विद्यार्थी जे काही शिकत असतो ते सर्व शिक्षणच असते. राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखड्याने म्हटल्याप्रमाणे बालकाचे जीवनानुभव समजून घेत अभ्यासक्रमातील नमूद केलेल्या घटकांना जोडून वर्गातील अध्ययन अनुभवाची रचना करणे आवश्यक आहे. असे घडले तर शिक्षण जीवनाभिमुख होण्याची शक्यता अधिक आहे. जे शिक्षण जीवनाभिमुख असते ते शिक्षण विद्यार्थी आनंदाने घेतात. शिक्षणाची वाट आनंददायीच असते. त्यामुळे शिक्षण आणि दिले जाणारे अध्ययन अनुभव हे जर विद्यार्थ्यांच्या जगण्यातील असतील, तर ती वाट मुलांना अध्ययनासाठी प्रेरित करत असते. शिक्षण हे नेहमीच माणसाला अनुभवांतून प्राप्त होत असते. अनुभवांसोबत निरीक्षण हा एक महत्त्वाचा भाग आहे. आपण अनुभव घेतल्यानंतर त्या अनुभवांच्या संदर्भाने चिंतन, मननाची भूमिका घेत प्रवास करता आला तर शिक्षणाचे चित्र आमूलाग्र स्वरूपात बदलू शकते. हे जगातील अनेक प्रगत देशांनी दाखवून दिले आहे. त्या वाटा आपल्याकडेही चालण्यासाठीचा प्रयत्न होतो आहे; मात्र त्या पाऊलवाटांचा महामार्ग होण्याची आता गरज निर्माण झाली आहे.

अनुभवांतून जे शिक्षण मिळते ते दीर्घकालीन स्मरणात राहते. त्यामुळे शिक्षणाचे विविध मार्ग तज्ज्ञांनी सांगितले आहेत. कानाने ऐकले जाते तेवढेच शिक्षण नाही, तर पंचज्ञान इंद्रियांद्वारे शिक्षणप्रक्रिया घडणे महत्त्वाचे असते. पंचज्ञान इंद्रियांद्वारे मिळणाऱ्या अनुभवांच्या आधारे विचार करायला शिकणे. चिंतन, मनन करणे हा प्रवास खऱ्या शिक्षणाचा असतो. हा प्रवास घडण्यासाठी चार भिंतीच्या पलीकडे जाऊन शिक्षणातील प्रयोगशीलता महत्त्वाची ठरते. असे बहुविध प्रयोग महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यातील शिक्षक करत आहेत. महाराष्ट्रातील शिक्षक हे नेहमीच प्रयोगशीलतेची वाट शोधत असतात. त्या दृष्टीने होणारे प्रयत्न सर्वांसाठीच प्रेरक राहिले आहेत. शिक्षणाचा विचार आपण जेव्हा करतो, तेव्हा मानवाचा माणूस घडविण्याचा प्रवास अधिक महत्त्वाचा वाटतो. गुणवत्ता म्हणजे केवळ गुण नाहीत; तर माणसाला आकार देणे, त्याच्या व्यक्तिमत्त्वाची जडणघडण करणे, विद्यार्थ्यांमधील सुप्त विचारप्रक्रियेला प्रत्यक्ष वास्तवात उतरवण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणे हे अधिक महत्त्वाचे आहे. विद्यार्थ्याला मिळणारे गुण हे पाठांतराऐवजी अध्ययन अनुभवाच्या आधारे झालेल्या विचारप्रक्रियेतून ज्ञाननिर्मिती करून मिळाले, तर त्या शिक्षणाला अर्थ आहे. असे शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यासाठी सातत्याने प्रयत्न होणे आवश्यक आहे.

महाराष्ट्रातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धापरीक्षांचे आयोजन करण्यात येत आहे. गेल्या काही वर्षांमध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग मोठ्या प्रमाणावर वाढतो आहे आणि शिक्षक जीव ओतून काम करत आहेत. काही शिक्षक अनुकरणाच्या वाटा चालत आहेत, तर काही शिक्षक नव्या वाटांचा शोध घेत शिष्यवृत्ती परीक्षेत नवे स्थान प्राप्त करत आहेत. ग्रामीण विद्यार्थ्यांना स्पर्धापरीक्षेचे बाळकडू शालेय स्तरावर मिळाले, तर भविष्यामध्ये उज्ज्वल यशासाठी हा पाया अधिक महत्त्वाची भूमिका बजावू शकेल. त्या दृष्टीने महाराष्ट्रातील विविध शाळांमध्ये घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांची माहिती व्हावी, या दृष्टीने या विशेषांकाचे आयोजन करण्यात आले आहे. संपादन मंडळाने यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. या अंकाच्या माध्यमातून राज्यातील सर्व शिक्षकांना नव्या वाटा शोधण्याची प्रेरणा मिळेल. त्यातून विदार्थ्यांच्या प्रज्ञावाटा खुल्या होतील, अशी अपेक्षा आहे. अंक वाचून आपण सर्वांनी आपल्या प्रतिक्रिया संपादन मंडळाला जरूर कळवाव्यात. तुमच्या सर्व प्रतिक्रियांचे मनःपूर्वक स्वागत होईल. तुम्हा सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा !

**राहूल रेखावार (भा.प्र.से.)**
**संचालक**
राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद,
महाराष्ट्र, पुणे.

# अनुक्रमणिका

◈ **वाटा गुणवत्तेच्या** १
जि. प. उच्च प्राथ. शाळा पचखेडी (गा.) पं. स. कुही, जि. नागपूर.

◈ **स्पर्धापरीक्षांच्या वाटेने...** ३
जि. प. केंद्रीय प्रा. शाळा वारंगा फाटा.

◈ **नवलाईचा प्रवास** ५
कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय तऱ्हावद, ता. तळोदा, जि. नंदुरबार.

◈ **पाऊल विकासाकडे...** ७
जि. प. प्राथ. शाळा आरग नं १, ता. मिरज, जि. सांगली.

◈ **यशाची वाट चालता...** ११
जि. प. प्राथ. शाळा शिरगाव, ता. वाई, जि. सातारा.

◈ **एक समृद्ध अनुभव** १३
जि. प. प्राथ. शाळा, धानोरे, ता. खेड, जि. पुणे.

◈ **कष्टाची वाट चालताना** १७
जि. प. प्राथ. आदर्श केंद्रशाळा मेढा. ता. जावळी, जि. सातारा.

◈ **आमची नवी वाट** २०
जि. प. प्रा. व माध्य. शाळा बोरगव्हाण ता. पाथरी, जि. परभणी.

◈ **प्रयत्नांची पराकाष्ठा** २२
पीएमश्री जि. प. आदर्श प्राथ. शाळा पापरी, ता. मोहोळ, जि. सोलापूर.

◈ **गुणवत्तेची भरारी...** २४
जि. प. प्राथ. शाळा बालमटाकळी, ता. शेवगाव, जि. अहमदनगर.

◈ **वाटा यशाच्या** २७
जि. प. प्राथ. शाळा वाबळेवाडी ता. शिरूर जि. पुणे.

◈ **प्रयत्नांती यश** २९
जि. प. प्राथ. शाळा कळस (बु.) ता. अकोले, जि. अहमदनगर.

# वाटा गुणवत्तेच्या

शाळा हे ज्ञानदानाचे महत्त्वाचे औपचारिक साधन आहे. येथे एक विशिष्ट ध्येयधोरणाच्या दिशेने जाण्याकरिता अभ्यासक्रम व इतर अध्ययनपूरक उपक्रम याद्वारे शिक्षणप्रक्रिया राबविली जात असते. हे विशिष्ट ध्येयधोरण कोणते, तर बालकांचा सर्वांगीण विकास करणे हे होय. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणत की, एखादी कल्पना मान्य अथवा अमान्य करण्याआधी त्या कल्पनेला पारखण्याची, तिच्याविषयी जाणून घेण्याची क्षमता विद्यार्थ्याने कमवायला हवी. अर्थात ही क्षमता विद्यार्थ्यांच्या अंगी बाणवण्याची जबाबदारी शिक्षक व एकूणच शिक्षणप्रक्रियेत सहभागी सर्व घटकांची आहे.

बाबासाहेबांच्या या विचाराला आज २१ व्या शतकात खूप महत्त्वाचे स्थान आहे. आज शिक्षण म्हणजे, केवळ ज्ञान मिळविणे नाही, तर त्याचा वापर संशोधनाच्या पातळीवर नेऊन नवीन संकल्पना व विचार प्रस्तुत करण्याच्या हेतू पूर्ण करण्याचा विचार होय. या विचाराची जगभर उपयुक्तता सिद्धही होते आहे. नवीन संशोधन, निष्कर्ष, सिद्धांत आज समोर येत आहेत, म्हणूनच आज जगाच्या उपयुक्ततेच्या दृष्टिकोनातून अभ्यासक्रमाचा विचार करतो, तेव्हा अध्ययन कौशल्ये व जीवन कौशल्ये यांचा मेळ घालावा लागतो. तो जागतिक पातळीवर घातलेला आपल्याला दिसतो. आपल्याकडेही तो विचार होतो आहे. तार्किक, चिकित्सक, रचनात्मक विचार, सहभाग नेतृत्व, पुढाकार, सहानुभूती, संवेदनशीलता, संवाद इत्यादी अध्ययन कौशल्ये व जीवन कौशल्ये म्हणून तो विचार आहे.

शिक्षणप्रक्रियेतील सहभागी सर्व घटकांच्या अंगी, हा विचार खोलवर रुजायला हवा. तेव्हाच शिक्षणाचे जे उद्दिष्ट ठरविले गेले आहे त्याची परिणामकारकता टप्प्याटप्याने आपल्याला अनुभवता येईल.

आज आमच्या शाळेचा जो शिष्यवृत्तीचा निकाल दिसतो आहे, तो निकाल त्या ध्येयदृष्टीने वाटचाल करण्याच्या दिशेने गाठलेला एक टप्पा आहे. प्रत्येक वर्गाचा अभ्यासक्रम पूर्ण करताना प्रत्येक घटकाचा शिष्यवृत्तीच्या दिशेने एक पाऊल म्हणून विचार केला जातो. त्या घटकांवर शिष्यवृत्तीच्या पातळीवर प्रश्न तयार करणे, ते प्रश्न विद्यार्थ्यांकडून सोडवून घेणे हा नित्याचा भाग म्हणून शिक्षक करत असतात. जेणेकरून शिष्यवृत्तीचा वेगळा असा सराव पुन्हा करवून घेताना अडचण निर्माण होत नाही व फारसा वेळही लागत नाही. शालेय उपक्रम व वर्ग उपक्रमही तार्किक व चिकित्सक विचार करण्याची सवय लागावी या हेतूने त्याच कौशल्यांवर निवडलेले असतात. उदा. कुतूहल, कोडे इत्यादी. याचा उपयोग शिष्यवृत्ती वर्ग अध्यापनात हमखास होतो. शिष्यवृत्ती वर्गाचे वर्ग-स्तरावर नियोजन करत असताना आवडीचा विषय शिक्षक निवडतात व त्या शिष्यवृत्ती वर्गाचे अध्यापन करत असतात. सहावी ते आठवीच्या वर्गाचे विषयशिक्षक तो विषय शिकवतात. वेळोवेळी शिष्यवृत्ती सराव परीक्षा, ऑनलाईन टेस्ट, शिक्षक मार्गदर्शन, समुपदेशन इत्यादी सत्र होतात. या प्रकारे शिष्यवृत्ती परीक्षेसंदर्भात शाळेत कार्यक्रम चालतो. शिवाय शाळेच्या ग्रंथालयाची या

शिष्यवृत्ती परीक्षेच्या यशोगाथेत महत्त्वाची भूमिका आहे. आमच्या शाळेच्या ग्रंथालयात या संदर्भाने अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. या सर्वांचा परिपाक म्हणून विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत पात्र ठरत आहेत.

**शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेले विद्यार्थी :**

सन २०२२-२३ मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेत यशस्वी झालेले चार विद्यार्थी व २०२३-२४ मध्ये आठ विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. या मुलांच्या यशात त्यांची चिकाटी, अभ्यासूवृत्ती यांचा निश्चितच वाटा आहे. याशिवाय त्यांचे पालक, मुख्याध्यापक, केंद्रप्रमुख, सर्व शिक्षकवृंद या सर्वांचे योगदानही आहे.

शिष्यवृत्तीचे हे यश फक्त विद्यार्थ्यांच्या उन्नतीतील एक भाग होय. तिथपर्यंत आम्ही पोहोचलो, पण पूर्णतः माणसाच्या उन्नतीचा विचार शिक्षणात असतो. तो साध्य होण्याकरिता, शिक्षक म्हणून आम्ही बांधील राहू.

**माधुरी सेलोकर**
**जि. प. उच्च. प्राथ. शाळा, पचखेडी (गा.)**
**प. स. कुही, जि. नागपूर.**

◈◈◈

# स्पर्धापरीक्षांच्या वाटेने...

जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा वारंगा फाटा ही हिंगोली जिल्ह्यातील सहा आदर्श शाळांपैकी एक शाळा आहे. शाळेत इयत्ता पहिली ते आठवीपर्यंतचे वर्ग असून, इयत्ता पाचवीपर्यंत सेमी इंग्रजी माध्यम आहे. जुलै २०२४ ची इयत्ता पहिली ते आठवीची विद्यार्थी संख्या २३८ असून, शाळेत जवळ असणाऱ्या मौजे भुवनेश्वर, दाभडी, तोंडापूर इत्यादी गावातून विद्यार्थी शिक्षणासाठी येत आहेत. शाळेत एकूण उच्च श्रेणी मुख्याध्यापकांसह ०८ मान्य पदे असून ही पदे कार्यरत आहेत.

आमच्या शाळेत इयत्ता पाचवी व आठवीच्या वर्गातील विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालय प्रवेश परीक्षा, शिष्यवृत्ती एनएमएमएस, एनटीएस, एमटीएस, प्रज्ञाशोध परीक्षांची विशेष तयारी करून घेतली जाते. फेब्रुवारी २०२४ मध्ये पूर्वमाध्यामिक शिष्यवृत्ती परीक्षेस इयत्ता पाचवीचे ११ विद्यार्थी आणि इयत्ता चौथीचे ०८ विद्यार्थी बसले होते त्यापैकी इयत्ता पाचवीमधील एक विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र ठरला.




शाळेतील इयत्ता पाचवीच्या विद्यार्थ्यांच्या स्पर्धापरीक्षेची तयारी शाळेतील राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षक श्री. नागरगोजे यांनी करून घेतली, आठवीच्या वर्गाची तयारी देशमुख, बिरादार, बोधागिदे यांनी करून घेतली. स्पर्धापरीक्षेत विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे म्हणून शिक्षक दररोज सकाळी एक जादा तासिका घेतात. यामध्ये एक विद्यार्थी शिष्यवृत्तीस पात्र झाला आहे.

शाळेतील विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धापरीक्षांविषयी आवड निर्माण व्हावी, शाळेत विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धात्मक वातावरण निर्माण व्हावे, यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले जातात. शाळेचे मुख्याध्यापक सूर्यवंशी हे शिक्षकांना हव्या त्या सर्व शैक्षणिक सुविधा निर्माण करून देतात जसे की सराव परीक्षा पेपर, ध्वनीफीत–ध्वनीचित्रफीत, शैक्षणिक साहित्य उपलब्ध करून देणे.

शाळेतील विद्यार्थ्यांना वरिष्ठांचे विशेष मार्गदर्शन मिळाले, यासाठी हिंगोलीचे वरिष्ठ अधिव्याख्याता निळेकर सर व त्यांचे सहकारी तसेच प्राचार्य यांचेही मोलाचे मार्गदर्शन लाभले, इतर शाळांमधील उपक्रमशील शिक्षकांचे मार्गदर्शन सत्रदेखील आयोजित करून विद्यार्थ्यांची तयारी करून घेतली. ऑनलाइन स्वरूपात शेवाळकर, लेकुळे यांचे मार्गदर्शनदेखील घेण्यात आले.

शाळा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी विविध उपक्रम शाळेत राबवते. शाळेत संगणकांची उपलब्धता झालेली असल्यामुळे संगणकावर सराव परीक्षांचे पेपर सोडवून घेण्यात आले. त्याचा भरपूर फायदा विद्यार्थ्यांना झाला. तसेच स्मार्ट क्लासच्या माध्यमातून Interactive Pannel वर अध्यापनाची सोय झाल्यामुळे विद्यार्थ्यांना अनेक तज्ज्ञांचे मार्गदर्शन मिळाले, याचा स्पर्धापरीक्षेसाठी विद्यार्थ्यांना फायदा झाला.

आमची शाळा आदर्श शाळा योजनेत समाविष्ट झाल्यामुळे, शाळेत अनेक प्रकारच्या अत्याधुनिक आणि नावीन्यपूर्ण सुविधा उपलब्ध झाल्या. नवीन बांधकाम झाल्यामुळे सुसज्ज नवीन इमारत, विद्यार्थ्यांना बसण्यासाठी चांगले वर्ग, वर्गात बसण्यासाठी बाक, पिण्याच्या पाण्याची उत्तम व्यवस्था, खेळाचे भरपूर साहित्य, रोबोट कीट, सुसज्ज विज्ञान प्रयोगशाळा व संगणक कक्ष, शालेय मैदान, स्वच्छतागृह, शालेय परसबाग/ औषधी वनस्पतींची परसबाग, प्रत्येक वर्गामध्ये पंखे इत्यादी सुविधा उपलब्ध असल्यामुळे विद्यार्थ्यांना आनंददायी पद्धतीने गुणवत्तापूर्ण शिक्षण देणे सोपे झाले आहे.

शिष्यवृत्ती परीक्षा तसेच गुणवत्तापूर्ण शिक्षण देण्यासाठी सर्व शिक्षकवृंद तज्ज्ञ आणि अनुभवी असल्यामुळे शाळा यशाची शिखरे पादाक्रांत करीत आहे. शाळेचे मुख्याध्यापक सूर्यवंशी सर, शाळेतील शिक्षक वाघमारे, नागरगोजे सर, बोधागिरे, बिरादार, शेख एक्वाल बेगम व गुंगे मॅडम यांच्या अथक परिश्रमातून शाळेचा यशाचा आलेख वाढतच आहे.



**पंडितराव नागरगोजे**

**जि. प. केंद्रीय प्राथ. शाळा**

**वारंगा फाटा.**

◈◈◈

# नवलाईचा प्रवास

आदिवासी देवमोगरा एज्युकेशन सोसायटी, नटावद संचलित कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, तऱ्हावद, ता. तळोदा, जि. नंदुरबार निवासी आदिवासी मुलींच्या शाळेत दरवर्षी एनएमएमएस परीक्षेसाठी मुलींना आग्रहाने प्रविष्ट केले जाते, परंतु त्यात त्यांना यश मात्र मिळत नव्हते. सन २०२३–२४ मध्ये मात्र शाळा गुणवत्ता विकास आराखडा (SQDP) तयार करतानाच एनएमएमएस परीक्षेत मुलींना गुणवत्ता यादीत स्थान मिळाले पाहिजे यासाठी नियोजन केले गेले. स्कॉलरशिप अभ्यासक्रमाची तयारी करण्यासाठी विशेष वर्ग अध्यापन नियोजन करण्यात आले. प्रत्येक विषयाच्या सरावासाठी पूर्णवेळ शिक्षकांची नेमणूक केली. ते रोज संध्याकाळी ४ ते ५ या वेळेत अध्यापन करून आठवड्यात ३ दिवस सराव घ्यायचे. त्यामुळे विद्यार्थिनींमध्ये परीक्षेविषयी आत्मविश्वास निर्माण झाला. सन २०२३–२४ मध्ये एनएमएमएस परीक्षेत एकूण ६ मुली बसल्या होत्या, त्यापैकी ५ मुली पात्र झाल्या आहेत. प्रतिकूल परिस्थितीतील विद्यार्थिनींचे हे यश आमच्यासाठी प्रेरणादायी यशोगाथाच आहे.

सन २०२३–२४ मध्ये शाळा गुणवत्ता विकास आराखडा (SQDP) तयार करतानाच आमच्या शाळेत जून महिन्यातच मुलींचा अध्ययन स्तर व आवड जाणून घेतल्या. त्यांना आवड असलेल्या क्षेत्रात विकासासाठी आवश्यक संधी उपलब्ध करून नियोजन केले. त्यानुसार मुलींची आवडनिवड लक्षात घेऊन अभ्यासाची आवड असणाऱ्या मुलींना एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षांना, चित्रकलेची आवड असणाऱ्या मुलींना चित्रकला ग्रेड परीक्षांना बसविले. खेळाची आवड असणाऱ्या मुलींना तालुकास्तरीय क्रीडा स्पर्धांमध्ये सहभाग घेण्यास संधी उपलब्ध करून दिली. सन २०२३–२४ मध्ये बुद्धिबळ स्पर्धेमध्ये विभागापर्यंत एका विद्यार्थिनीने सहभाग नोंदविला. तालुका स्तरावर, खो–खो, कबड्डी संघ, मैदानी खेळात ३ मुली तालुका स्तरावर जिंकल्या. सन २४–२५ मध्ये तालुका स्तरावर बुद्धिबळामध्ये १४ वर्षांच्या आतील व १७ वर्षांच्या आतील २ मुली जिंकल्या, गायन व नृत्याची आवड असणाऱ्या मुली सांस्कृतिक कार्यक्रम सादर करतात. सहलीचे नियोजन पण दरवर्षी करतो. गेल्या वर्षी स्टॅचू ऑफ युनिटी, गुजरात येथे सहल गेली होती. जिल्हा स्तरावरून २ मुली औरंगाबादला व राज्य स्तरावरून २ मुली गुजरातला गेल्या होत्या त्यामुळे शाळेत आनंददायी वातावरण निर्माण झाले आहे. मुली शाळाबाह्य होण्याचे प्रमाणही बंद झाले आहे. इयत्ता दहावीचा निकाल दरवर्षी १००% लागतो. हे यश आमच्यासाठी प्रेरणादायी यशोगाथाच आहे.

कु. वैशाली वसावे ही दिव्यांग विद्यार्थिनी इयत्ता सहावीत दिनांक १५ जून, २०२० ला प्रवेशित झाली, आता ती इयत्ता नववीमध्ये शिकत आहे. तिला कानांनी ऐकू येत नाही व ती बोलू पण शकत नाही, तिचे राहणीमान टापटीप आहे. तिच्या व्यक्तिमत्त्वात बराच बदल झाला असून, आज तिचे नाव वर्गात हुशार विद्यार्थ्यांच्या यादीत आहे. अभ्यासाव्यतिरिक्त तिच्यात इतर सुप्तगुणही आहेत. कार्यानुभव विषयामध्ये

विविध कलाकुसरीतून वस्तू तयार करू शकते. आठवीत स्कॉलरशिप परीक्षेला ती बसली होती, तिने यावर्षीची चित्रकलेची परीक्षा दिली. तिला खेळायलासुद्धा आवडते. अशी ही वैशालीची जडणघडण होऊन व्यक्तिमत्त्व विकसित झाले आहे.

हे यश कोणा एकट्याचे नसून समूहाचे आहे. माझे सर्व सहकारी, संस्था पदाधिकारी यांचे मोलाचे योगदान आहे.

**वर्षा पाटील**
**कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय, तऱ्हावद,**
**ता. तळोदा, जि. नंदुरबार.**

◈◈◈

# पाऊल विकासाकडे...

आरग हे सांगली जिल्ह्यातील, मिरज तालुक्यात असणारे समृद्ध व टुमदार गाव. आरग गाव तसे हिरवेगार, शेताने वेढलेले पानमळे, हळद, द्राक्षे, ऊसाची समृद्ध शेती असणारे गाव.

या गावातील लोक कष्टाळू, सतत उद्योगात मग्न असणारे. घर, कुटुंब, समाज पर्यायाने गावाची प्रगती कशी करायची याचा सतत विचार करणारे.

१८६९ साली गावात शाळेची स्थापना झाली. जिल्हा परिषद शाळा नंबर १ आरग. प्रथमत: या शाळेला प्रतिस्पर्धी म्हणून इतर कोणतीही शाळा नव्हती, त्यामुळे मुलांचा पट भरपूर होता. इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या वर्गात ८०–९० मुलांचा पट असायचा. शाळेचे हे रोपटे दिवसागणिक वाढत होते. शाळेला प्रतिस्पर्धी खाजगी शाळा निघाल्या, हायस्कूल, मुला–मुलींची एक असणारी शाळा आता विभागली गेली फक्त मुलांची व मुलींची अशा दोन वेगळ्या जिल्हा परिषदेच्या शाळा झाल्या. शिक्षकवर्ग शाळेत विद्यादानाचे काम प्रामाणिकपणे व मन लावून करत होता. त्यावेळी इयत्ता चौथी व सातवी बोर्ड परीक्षा होती. त्या वेळी मुलांनी बोर्ड परीक्षेचा अभ्यास करावा म्हणून शाळेत रात्रीचे वर्ग भरविले जायचे, त्याला 'रात्र अभ्यासिका' असे म्हणायचे. गुरुजी रात्री शाळेतील एका वर्गात लाईटची सोय करून, मुलांना अभ्यास करायला लावायचे. रात्री उशिरापर्यंत अभ्यास करून मुले तिथेच झोपायची. गुरुजी पहाटे परत मुलांना अभ्यास करायला उठवायचे, अभ्यास करून झाला की, आठच्या दरम्यान मुले अंथरूण गुंडाळून घरी जायची.



त्यावेळी सुद्धा गुणवत्ता सुधारण्यासाठी, शिक्षक आटोकाट प्रयत्न करायचे. साधी राहणीमान असणारे गुरुजी आपल्या अनुभवातून, कडक शिस्तीतून, पाठांतरातून, प्रसंगी छडीचा वापर करून त्यांनी अनेक डॉक्टर, इंजिनिअर, वकील, व्यावसायिक व शिक्षक घडविले. गुरुजींचा शब्द म्हणजे 'पडत्या फळाची आज्ञा' असे समजून विद्यार्थीसुद्धा अभ्यासाला लागायचे. 'गुरुविण कोण दाखवील वाट' या उक्तीप्रमाणे, जग कितीही पुढे गेले तरी मार्गदर्शक हा हवाच असतो. विद्यार्थ्यांच्या जीवनात शिक्षकांचे स्थान अबाधित आहे. काळ बदलत गेला, समाज बदलला, माणसू बदलला, काळाने शिक्षणपद्धती बदलली, नवनवीन तंत्रज्ञान शिक्षणपद्धतीत आले. अभ्यासक्रमात आमूलाग्र बदल झाले, पण हर्बटची पंचपदी अजूनही अप्रत्यक्षरीत्या शिक्षणात वापरली जाते.

अध्यापनात ई–लर्निंगचा समावेश झाला. विविध स्पर्धापरीक्षा निर्माण झाल्या. नवनवीन शोध लागले. त्याप्रमाणे पालकांमध्येही बदल झाले. जागतिकीकरणामुळे जग जवळ आले. शाळांमध्ये भौतिक बदल, अध्यापनपद्धती

बदलत गेल्या. जग जवळ आल्याने मोबाइलच्या व कॉम्प्युटरच्या साहाय्याने आपणास हवी ती शैक्षणिक माहिती सहज मिळवता येऊ लागली विद्यार्थ्यांकडून व शाळेकडून पालकांच्या अपेक्षा वाढल्या.

इयत्ता पाचवी व आठवीला शिष्यवृत्ती परीक्षा, आठवीला एनएमएमएस परीक्षा सगळीकडे घेतल्या जाऊ लागल्या. प्रथम शिष्यवृत्ती परीक्षेविषयी पालकांच्या व विद्यार्थ्यांच्या मनात आस्था निर्माण करताना शिक्षकांना थोडे कष्ट घ्यावे लागले.

- या शिष्यवृत्ती परीक्षेला विद्यार्थ्यांना बसविण्यासाठी पालकभेटी, पालकसभा घेऊन, पाल्य व पालक यांना प्रेरित केले, पालकांचे विद्यार्थ्यांच्या गृहपाठाकडे मात्र दुर्लक्ष असायचे. पालकवर्ग त्यांच्या दैनंदिन कामात गुंतलेला असायचा. अध्यापनाचे काम शाळेत सकाळी ९:३० ते १०:३० या वेळेत जादा तास घेऊन केले जायचे. मुलांनी मन लावून अभ्यास करावा असे वाटण्यासाठी त्यांना प्रेरणा देणे आवश्यक होते. शिक्षकांनी, जो विद्यार्थी रोज तासाला प्रथम येतो त्याचे कौतुक करण्यास सुरुवात केली. जो मुलगा रोज अभ्यास करून येतो त्याचे फूल देऊन कौतुक करायचे. फुले शाळेच्या आवारातील झाडाची असायची. मुलांना हळूहळू आपले कौतुक व्हावे, शाबासकी मिळावी असे वाटू लागले आणि मुले अभ्यास करू लागली.
- प्रथम २ मुले शिष्यवृत्ती गुणवत्ता यादीत आली. त्या मुलांचा, १५ ऑगस्टला सत्कार करण्यात आला. मुलांना प्रेरणा मिळाली. शिक्षकांना कामाची पोचपावती मिळाली. शिक्षकही जोमाने कामाला लागले. मुलांना मार्गदर्शन करण्यासाठी शेजारील केंद्रातील शिष्यवृत्ती परीक्षेत निष्णात असलेला गुरुजन वर्ग बोलावला. ज्ञानाची आपापसात देवाणघेवाण होऊ लागली. आठवड्यातून १–२ दिवस वेगवेगळ्या केंद्रातील शिक्षक येऊन आवडता व विद्यार्थ्यांना कठीण वाटणारा घटक शिकवू लागले, युक्त्या, क्लृप्त्या समजावून देऊ लागले.

  या शाळेतील शिक्षकही वेगवेगळ्या शाळांमध्ये जाऊन मार्गदर्शनाचे काम करू लागले. शाळेचे रूप हळूहळू पालटत गेले. शाळेचे वेळापत्रक तयार झाले.
- दिवाळी सुट्टीत चार दिवस आणि उन्हाळी सुट्टी पंधरा दिवस असते, त्यानंतरही जादा तास असतात. मराठी नववर्षाच्या पहिल्याच दिवशी म्हणजे गुढीपाडव्याच्या दिवशी शिष्यवृत्ती परीक्षा व एनएमएमएस या परीक्षेचा अभ्यासक्रम शिकवण्यास सुरुवात केली जाते. यासाठी स्मार्ट बोर्डचा वापर प्रभावीपणे केला जातो. विविध प्रश्नपत्रिकांचा सराव घेतला जातो. ऑनलाइन मार्गदर्शनाचा ही विद्यार्थ्यांना लाभ दिला जातो.

  शिष्यवृत्ती परीक्षेबरोबर मात्र 'गुणवत्ता' शिष्यवृत्ती परीक्षा, सातारा सैनिक स्कूल तयारी, नवोदय तयारी करून घेतली जाते.

- सन २०१९ सालात इयत्ता पाचवी जिल्हा गुणवत्ता यादीत २ मुले चमकली. सन २०२० मध्ये इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा गुणवत्ता यादीत ५ मुले आणि नवोदयमध्ये २ विद्यार्थ्यांची निवड झाली. नवोदय विद्यालयात निवड-सन २०१९-२० ला २ विद्यार्थ्यांची निवड झाली. २०२३-२४ ला पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा इयत्ता आठवीमध्ये ८ मुले गुणवत्ता यादीत आली त्यापैकी १ विद्यार्थी राज्य गुणवत्ता यादीत आला. जिल्हा गुणवत्ता यादीत ७ विद्यार्थी चमकले. इयत्ता पाचवी २ मुले जिल्हा गुणवत्ता यादीत आली. सन २०२२-२३ इयत्ता पाचवीतील ३ मुले गुणवत्ता यादीत चमकली. इयत्ता आठवीतील ४ मुली गुणवत्ता यादीत चमकल्या. सन २०२३-२४ इयत्ता आठवी-१० दहा मुले एनएमएमएस परीक्षेत चमकली. जिल्ह्यात एकाच शाळेची १० मुले गुणवत्ता यादीत येणारी, पहिली शाळा ठरली.




- जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळविणारा याच शाळेचा विद्यार्थी - मोरेश्वर शंकर गुरव हा आहे.
- इयत्ता आठवी शिष्यवृत्ती परीक्षेतसुद्धा यावर्षी विद्यार्थ्यांनी चांगले यश संपादन केले. तब्बल ८ मुले जिल्हा गुणवत्ता यादीत चमकली. सारथी परीक्षेत मुलांनी उज्ज्वल यश संपादन केले. सारथी आणि गुणवत्ता यादीत आलेल्या मुलांची संख्या ६४ इतकी आहे. यशाच्या परंपरेचा हा आलेख दरवर्षी चढताच आहे. प्राथमिक स्तरापासूनच मुलांना स्पर्धापरीक्षांचे बाळकडू पाजले जाते. गुणवत्ता यादीत येणाऱ्या मुलांचा आलेख दरवर्षी वाढतच आहे.

मुख्याध्यापक, शिक्षक, पालक यांच्या मार्गदर्शनातून, कष्टातून व विद्यार्थ्यांच्या अभ्यास व प्रयत्नातूनच हे यश मिळविणे शक्य झाले आहे.

शाळेची गुणवत्ता ही शाळेची ओळख आहे. विविध कलागुण, वक्तृत्व, कथाकथन, विविध खेळ, नाटिका, विविध उपक्रम यांनी सजलेली शाळा कोणालाही शाळेचा हेवा वाटावा अशीच आहे.

**सपना घोगरे**
**जि. प. प्राथ. शाळा आरग नं १,**
**ता. मिरज, जि. सांगली.**

◈◈◈

# यशाची वाट चालता...

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती परीक्षेतील यश म्हणजे शाळेची गुणवत्ता दाखवण्याची संधी, या दृष्टीने फेब्रुवारी २०२४ मध्ये शिष्यवृत्ती परीक्षेसाठी शिरगाव शाळेतील पाचवीचे वर्गशिक्षक श्री. रामदास जाधव यांनी १ जून पासूनच जादा तास घेण्याची सुरुवात केली.

शिष्यवृत्ती परीक्षेसाठी समजपूर्वक वाचन आवश्यक आहे. त्यासाठी तिसरी, चौथी व पाचवीची पाठ्यपुस्तके, गोष्टींची पुस्तके व वर्तमानपत्र वाचन याचे वर्गात दुपारी जेवणाच्या सुट्टीमध्ये वाचन घेतले. दररोज वाचन घेतल्यामुळे मुलांची वाचनगती सुधारली, मुले समजपूर्वक वाचू लागली. प्रश्नांमध्ये कोणती माहिती दिली आहे व कोणती विचारली आहे हे मुलांना समजू लागले. प्रश्नांचे आकलन चांगले होऊ लागले.

गणित व बुद्धिमत्ता चाचणी या विषयांसाठी मुलांना कच्चे काम करणे आवश्यक असते. कच्च्या कामाचा सराव होण्यासाठी शाळा सुटण्याच्या अगोदर दररोज अर्धा तास गणितीय आकडेमोडीचा सराव घेतला.

परीक्षेला सामोरे जात असताना विद्यार्थी, शिक्षक व पालक ही त्रिसूत्री जुळणे आवश्यक असते, त्यासाठी दर महिन्याला शाळेमध्ये इयत्ता पाचवीच्या वर्गाची पालकसभा घेतली. पालकांना शिष्यवृत्ती परीक्षेचे महत्त्व, मुलांचे आरोग्य, अभ्यास व घरातील आनंददायी वातावरण यांचे महत्त्व समजून सांगितले. वर्गातील सर्व पालकांनी आवश्यक स्कॉलरशिप परीक्षेसाठी साहित्य, उत्तरपत्रिकांची प्रिंट, प्रश्नसंच खरेदी करणे, मार्गदर्शक पुस्तके खरेदी करणे यासाठी सहकार्य केले. शाळा व्यवस्थापन समितीनेही प्रश्नसंच खरेदी करून दिले.

सर्व गोष्टींची पूर्तता झाल्यानंतर सप्टेंबर २०२३ अखेर स्कॉलरशिप परीक्षेचा संपूर्ण अभ्यासक्रम व इयत्ता पाचवीची पाठ्यपुस्तके पूर्ण झाली. जून ते सप्टेंबर या कालावधीमध्ये शिष्यवृत्तीचे घटकनिहाय प्रश्नसंच सोडवून घेतले.

शिक्षण विभाग पंचायत समिती वाई यांच्यामार्फत १ जुलै, २०२३ पासून दररोज स्कॉलरशिपचे ऑनलाइन मार्गदर्शन इयत्ता तीन ते चार या वेळेत असायचे. दररोज प्रत्येक उपघटकावर आधारित २० ते ४० गुणांची ऑनलाइन टेस्ट लिंक दिली जायची. ती लिंक पालकांच्या व्हॉट्सअॅपवर पाठवून मुलांकडून सोडवून घेतली जायची. त्याच्या नोंदी दररोज मूलनिहाय वर्गात केल्या जायच्या. त्या नोंदी केल्यामुळे विद्यार्थ्यांना कोणत्या उपघटकाचे चांगले आकलन झाले आहे व कोणत्या उपघटकात, विषयात मार्गदर्शनाची गरज आहे हे समजले. त्यानुसार मूलनिहाय काम करणे सोपे झाले. पंचायत समिती शिक्षण विभाग वाईमार्फत प्रत्येक महिन्याला सराव परीक्षा घेतली. त्यामध्ये मुलांनी प्राप्त केलेले गुण मूलनिहाय, विषयनिहाय वर्गाच्या दर्शनी भागात लावले जायचे. त्यामुळे मुलांमध्ये सर्वांत जास्त गुण मिळवण्याची स्पर्धा सुरू झाली. पंचायत समितीमार्फत एकूण ८

सराव परीक्षा घेण्यात आल्या. त्यामध्ये प्रत्येक सराव परीक्षेत वर्गातील वेगळ्या विद्यार्थ्यांनी प्रथम क्रमांक मिळवला. या कामी वाई तालुक्याचे शिक्षण विस्तार अधिकारी व गटशिक्षणाधिकारी श्री. साईनाथ वाळेकर, श्री. सुधीर महामुनी यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.

अभ्यासक्रम पूर्ण झाल्यावर सप्टेंबरनंतर सराव पेपर सुरू केले. घेतलेल्या प्रत्येक सराव परीक्षेची मराठी, गणित, इंग्रजी व बुद्धिमत्ता चाचणी या विषयांमध्ये पडलेल्या गुणांची नोंद स्वतंत्र फाईल करून मूलनिहाय केली. त्यामुळे कोणता विद्यार्थी कोणत्या विषयात चांगला आहे व कोणत्या विद्यार्थ्याला कोणत्या विषयाच्या मार्गदर्शनाची गरज आहे हे समजले. दर महिन्याला होणाऱ्या पालकसभेमध्ये विद्यार्थी कोणत्या विषयात चांगले गुण प्राप्त करत आहे व कोणत्या विषयाच्या तयारीची आवश्यकता आहे याची पालकांबरोबर चर्चा केली आणि पालकांच्या मदतीने मुलांची तयारी करून घेतली.

दिवाळीच्या सुट्टीत मुलांनी फक्त पाच दिवस सुट्टी घेतली. उरलेल्या दिवसात वर्गशिक्षक यांनी सकाळी दहा ते पाच स्कॉलरशिप मार्गदर्शन सुरू ठेवले. त्यामुळे मुलांची तयारी चांगली झाली. जानेवारी व फेब्रुवारी महिन्यात सकाळी आठ ते सायंकाळी सात वाजेपर्यंत शाळेतच वाचन, पाठांतर, प्रश्नपत्रिका सोडवून घेणे, न समजलेल्या घटकांवर मार्गदर्शन करणे अशा प्रकारची सर्व तयारी शाळेमध्येच करून घेतली. शाळा सुटल्यानंतर पाच वाजता मुलांना भूक लागते त्यामुळे वर्गातील दररोज एका पालकांनी जबाबदारी घेऊन पाच वाजता स्वयंस्फूर्तीने नाष्टा आणून दिला. त्यामुळे भरल्या पोटी सायं. ७ वाजेपर्यंत अध्ययन करणे मुलांना सोपे झाले. सायंकाळी घरी गेल्यानंतर मुलांनी आराम करणे, विश्रांती घेणे एवढ्याच गोष्टी सुरू ठेवल्या.

परीक्षेला सामोरे कसे जावे? याबाबत शाळेचे माजी मुख्याध्यापक मोरे सर, सध्याच्या मुख्याध्यापक गायकवाड मॅडम व शाळेमधील शिक्षकांनी मार्गदर्शन केले. वर्गाचा पट २५ असणाऱ्या वर्गांमधील २५ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेला बसवले त्यामधील २३ विद्यार्थी पात्र ठरले. १७ विद्यार्थ्यांनी २०० पेक्षा जास्त गुण मिळवले. श्वेता संदीप पिसाळ हिने २८४ गुण मिळवून राज्य गुणवत्ता यादीत पाचवा क्रमांक, जिल्हा गुणवत्ता यादीत दुसरा क्रमांक, वाई तालुक्यात प्रथम क्रमांक, बुद्धिमत्ता चाचणी विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. श्रुती आनंदराव भोसले हिने २७२ गुण प्राप्त करून राज्य गुणवत्ता यादीत चौदावा क्रमांक, जिल्हा गुणवत्ता यादीत बारावा क्रमांक, वाई तालुक्यात द्वितीय क्रमांक व गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. वैष्णवी राजेंद्र वाघ २६४ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत २४ वा क्रमांक, गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. श्रेयश जनार्दन सावंत याने २६२ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत २९ वा क्रमांक, स्वरा रामदास जाधव हिने २६० गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ३७ वा क्रमांक, सृष्टी संजय भोसले हिने २५८ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ४९ वा क्रमांक, वैष्णवी दत्तात्रय निकम हिने २५६ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ५५ वा क्रमांक, वैष्णवी तुषार भोसले हिने २४६ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत ११८ वा क्रमांक, रिया गणेश देवकर हिने २४४ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत

१४४ वा क्रमांक व गणित विषयात १०० पैकी १०० गुण प्राप्त केले. वेदांत सचिन भोसले याने २३८ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत १९८ वा क्रमांक, अनुष्का विकास भोसले हिने २३४ गुण मिळवून जिल्हा गुणवत्ता यादीत २५६ वा क्रमांक मिळवला. राज्य गुणवत्ता यादीत २ विद्यार्थी, जिल्हा गुणवत्ता यादीत ९ असे एकूण ११ विद्यार्थी ग्रामीण भागातील जि. प. आदर्श प्राथमिक शाळा शिरगाव ता. वाई, जि. सातारा शााळेचे शिष्यवृत्तीधारक झाले.

**रामदास जाधव**
**जि. प. प्राथ. शाळा शिरगाव,**
**ता. वाई, जि. सातारा.**

# एक समृद्ध अनुभव

‘शाळेच्या परंपरेच्या स्कॉलरशिपच्या तयार असलेल्या मुकुटात मानाचा आणखी एक तुरा रोवण्याचे काम माझ्या हातून घडवून आणले. हे सर्व माझ्या सहकारी वर्गाच्या सहकार्याने, आशीर्वादाने, मार्गदर्शनानेच घडू शकले. त्याचबरोबर वेळोवेळी खंबीरपणे पाठीशी उभे राहून योग्य वेळी तो सल्ला देऊन कठीण प्रसंगात योग्य मार्गदर्शन करत सतत मनात उमेद निर्माण करणारे आमचे मुख्याध्यापक लोखंडे सर यांच्या प्रेरणेनेच हे यश शक्य झाले असे म्हणतात,

*उत्तिष्ठत जाग्रत प्राप्य वरान्निबोधत।*
*क्षुरस्य धारा निशिता दुरत्यया दुर्गं*
*पथस्तत्कवयो वदन्ति।।* (कठोपनिषद)

म्हणजेच उठा, जागे व्हा आणि आपले लक्ष ठरवा. मार्ग जरी कठीण आणि दुर्गम असला तरी अशा कठीण मार्गावर चालले तर सफलता ही नक्कीच मिळते. या श्लोकाला साजेसे असे यश पाचवी शिष्यवृत्ती २०२३–२४ या परीक्षेत मिळवले. शिष्यवृत्तीमध्ये तेरा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली, वर्गाचा निकाल ९३% लागला माझ्यासाठी पाचवी शिष्यवृत्ती म्हणजे ‘तिमरातून तेजाकडे’ गेल्यासारखे आहे. नोकरीच्या १९ वर्षांत विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करताना कलेला जास्त झुकते माप देणारी मी गुणवत्तेला तितकाच न्याय देऊ शकेल का ? असा मला नेहमीच प्रश्न पडायचा. २०२२–२३ हे चौथीचे वर्ष म्हणजे आमच्यासाठी एक खास पर्वणीच होती.

भजन, विज्ञान प्रदर्शन, नाट्य, लेझीम, अमृतमहोत्सव चित्रकला, राज्यस्तरीय लोकनृत्य अशा तब्बल सहा कला–क्रीडा स्पर्धांमध्ये आमच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरावर प्रथम क्रमांक पटकावला होता. त्यामुळे शिष्यवृत्तीच्या दृष्टीने चौथीच्या अभ्यासावर थोडासा परिणाम नक्कीच झाला, आवड आणि आत्मविश्वास असेल तर कोणतीच गोष्ट अवघड नाही. या गोष्टीवर माझा तितकाच विश्वास होता. या विश्वासाने मी १ मार्च, २०२३ पासून शिष्यवृत्तीचा पाचवीचा अभ्यासक्रम सुरू केला.

खेळामध्ये प्रावीण्य दाखवणाऱ्या माझ्या विद्यार्थ्यांना मला या वर्षासाठी वर्गाच्या चार भिंतीच्या आत ठेवून, शिष्यवृत्तीच्या दृष्टीने त्यांना तयार करणे ही माझ्यासाठी खूप आव्हानात्मक गोष्ट होती. सर्वांत आधी मुलांना शिष्यवृत्तीचे महत्त्व समजून सांगितले. होणारे फायदे त्यांच्या लक्षात आणून दिले. शाळेच्या निकालाच्या परपंरेची असलेली जबाबदारी ही त्यांना समजावून सांगितली हे वर्ष अत्यंत प्रामाणिकपणे अभ्यासासाठी घालवूया असे आम्ही ठरवले. पहिल्याच महिन्यात १ मार्चला पालकसभा घेतली. शिष्यवृत्तीबद्दल सर्व कल्पना देऊन पालकांना १०० टक्के सहकार्य करण्याची विनंती केली. पालकांनी तसे आश्वासनही दिले.

शिष्यवृत्तीचे आव्हान स्वीकारून जर मोठे स्वप्न साकार करायचे असेल, तर सगळ्यात महत्त्वाची पायरी म्हणजे नियोजन. आपल्याकडे काय आहे? अजून काय करता येईल? आपल्याला काय साध्य करायचे आहे? या गोष्टी ठरवूनच त्याप्रमाणे नियोजन केले. मुलांचा मराठी, इंग्रजी वाचन–लेखनाचा व गणिताचा सर्व पाया पक्का करून घेतला, त्यामुळे गणितासाठी खूप अडचणी आल्या नाहीत. शिष्यवृत्तीबद्दल थोडीशी माहिती आम्ही मिळवली. मागील काही वर्षांचा आढावा घेतला. सहकारी शिक्षकांबरोबर चर्चा केली. त्यावेळी मुलांच्या पाठांतरासाठी विशेष प्रयत्न करावे लागतील असे मला वाटले. त्यामुळे सकाळी लवकर उठून मुलांनी वाचले पाहिजे यासाठी वाचनाच्या तासाचे नियोजन केले. सकाळी लवकर उठून वर्गाच्या व्हॉट्सअॅप गटावर मुलांनी सेल्फी टाकायला सुरुवात केली. सुरुवातीला काही दिवस पाच वाजताच ओळीने मुलांना फोन करायला सुरुवात केली. माझा फोन येईल, या काळजीने वाचन करण्यासाठी मुले सकाळी लवकर उठायला लागली. सतत पंधरा दिवस रोज वाचन करण्यासाठी उठणाऱ्या मुलांना बक्षीस दिले. त्यामुळे माझ्या या वाचन उपक्रमाला खूपच चांगले यश मिळाले.

त्यानंतर विद्यार्थ्यांचे त्यांच्या अभ्यासाच्या प्रगतीनुसार गट केले. सर्वप्रथम गुणवत्ता यादीत येण्यासारखी जी मुले होती त्यांचा एक वेगळा गट केला. मध्यम बुद्धिमत्ता असणाऱ्या विद्यार्थ्यांचा एक गट केला आणि अभ्यासात मागे पडणाऱ्या मुलांचा एक गट केला. एक एक घटक शिकवायला सुरुवात केली. शिकवलेल्या घटकावरचेच प्रश्न आधी सोडवले. चुकलेला प्रश्न व न समजलेला घटक पुन्हा पुन्हा मुलांना समजून सांगितला. त्यासाठी यूट्यूबचे बरेच ध्वनिचित्रफीत पाहिल्या. वर्गात मुलांना प्रत्येक घटकाचा व्हिडिओ दाखवला त्यानंतर फळ्यावरती त्या प्रकारचे प्रश्न सोडवून घेतले. यामुळे मुलांना घटक समजणे सोपे झाले. पहाटे उठणे, वाचन करणे त्यानंतर बरोबर आठ वाजता शाळेत हजर राहणे हा मुलांचा नित्यक्रम सुरू झाला. आमचा वर्ग सकाळी आठ ते संध्याकाळी सहापर्यंत सुरू असायचा. वर्षभरात एकही सुट्टी मुलांनी घेतली नाही. कोणत्याही रविवारी व सणाच्या दिवशीही शाळेत येण्याचा त्यांनी कंटाळा केला नाही. ''मला हे करायचे आहे मी हे करणार !'' पहिलीपासूनचे आमचे हे ब्रीदवाक्य अशी प्रत्येक मुलाची भावना तयार झाली होती. रोज नवीन गोष्टी शिकत होतो, उजळणी करत होतो, पाठांतरही आवडीने करत होतो. छान पाठांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांना छोट्या छोट्या शालेय उपयोगी वस्तू बक्षीस दिल्या. अशा पद्धतीने १ मार्च ते ३० ऑगस्टपर्यंत आमचा गणिताचा सर्व पाठ्यक्रम दोन वेळा पूर्ण झाला. सोबत परिसर व मराठीचे पाठांतरही बऱ्यापैकी पूर्ण झाले. आता सरावाचे पेपर सुरू करण्याची वेळ आली होती.

१ सप्टेंबर पासून आमचे सराव पेपर सुरू झाले. पहिला पेपरला अपेक्षित असा निकाल मिळाला नाही. त्या रात्री झोपच आली नाही, आपण कुठेतरी चुकतो का? याचा शोध घ्यावा लागला. इतके दिवस शिकवले ते नक्की मुलांना समजले असेल ना? असा प्रश्न पडला. याबाबत मुलांशी चर्चा केली, तेव्हा मुलांना सर्व येत होते पण वेळ कमी असल्याकारणाने मुले प्रत्येक प्रश्न योग्य विचारपूर्वक सोडवत नव्हती हे लक्षात आले. पहिले चार सराव पेपर थोडे नाराजीत गेले. सरांच्या सल्ल्यावरून मग सुरुवातीला मुलांना वेळ वाढवून देण्याचे

ठरवले मग मात्र अपेक्षित बदल जाणवला. पहिले २० पेपर मधील प्रत्येक प्रश्न फळ्यावर पुन्हा सोडवून दिले. खूप वेळ जात होता. त्यानंतर चुकलेला प्रश्न त्याच उत्तरपत्रिकेच्या मागच्या बाजूला सोडवून घेतला, घरी गेल्यावर चुकलेल्या प्रश्नांसाठी वेगळी वही करून त्यातही लिहायला सांगितले. त्यामुळे प्रश्न सोडवताना त्यांच्या कशा चुका झाल्या हे मुलांच्या लक्षात येऊ लागले. त्याचा खूप मोठा फायदा झाला.

पाठांतरासाठीही स्पर्धा व खेळ अशा वेगळ्या गोष्टी सुरू केल्या. माझ्या मुलांना पहिलीपासूनच गाण्यांची खूप आवड होती याचा फायदा मी करून घेतला. बरेच घटक मी गाण्यातून मुलांना लक्षात ठेवायला शिकवले. पुणे जिल्ह्यातील तालुके, सर्व राज्ये व त्यांच्या राजधान्यांची नावे, नक्षत्रांची नावे, शिवरायांचे मंत्रिमंडळ, महाराष्ट्राचे भौगोलिक विभाग आणि परिसर अभ्यासातील अनेक अवघड गोष्टी लक्षात ठेवण्यासाठी वेगवेगळ्या युक्त्या तयार केल्या. या प्रयोगामुळे मुलांच्या अभ्यासात वेगळेपण आले. स्वतः मुलांनी काही कोडींग वर्ड तयार केले आणि उत्साहाने अभ्यास करू लागले. प्रत्येक गटाचे मार्क तीन वेगवेगळ्या गटात लिहून वर्गाच्या व्हॉट्सॲप गटात पाठवले. गटावर आपले पालक आपले गुण बघतात यामुळे मुलांना वेगळी चालना मिळाली. अभ्यासात मागे असणाऱ्या विद्यार्थ्यांनी आपल्याला पास होण्यापुरते प्रश्न कसे सोडवता येतील याकडे विशेष लक्ष दिले.

त्यामुळे वर्गाचा निकाल ९३% लागू शकला याचा फार मोठा आनंद वाटला. सुरुवात तर छान झाली, पण संपूर्ण वर्षभरात एकामागे एक अडचणी मात्र येत गेल्या. सरकारी प्रपत्रामुळे मुलांना द्यावी लागलेली अनिवार्य उन्हाळी सुट्टी, एप्रिलमध्ये आम्हा शिक्षकांचे आठ दिवसांचे प्रशिक्षण, पावसाळ्यात होणारे वेगवेगळे आजार, डोळ्यांची साथ, यशवंतराव चव्हाण कला-क्रीडा महोत्सवाची मिळालेली जबाबदारी, असे असताना आमचा सराव सुरूच ठेवला.

प्रश्नपत्रिका सोडवताना मुलांना योग्य अंतरावर बसवले. परीक्षा पद्धतीने सराव घेतले. मराठी व गणित विषयांच्या प्रश्नपत्रिका असलेल्या विद्यार्थ्यांना वेगळी सुट्टी दिली, ती मुले वर्गात आल्यानंतर बुद्धिमत्ता व इंग्रजीच्या मुलांची सुट्टी केली. पेपर संपेपर्यंत ही मुले एकमेकांच्या संपर्कात येणार नाहीत याची काळजी घेतली.

विद्यार्थी जास्त गुण मिळवण्यासाठी नकळत वेगवेगळ्या मार्गांचा अवलंब करतात हे लक्षात आले. एकमेकांना मदत करणे, उत्तरांचे पर्याय सांगणे, खुणा करणे हा प्रकार माझ्याही विद्यार्थ्यांनी केला. खूप टेन्शन आले त्यावेळी पण हे करणे कसे योग्य नाही, यामुळे त्याचे काय तोटे होतील या संदर्भात मुलांशी चर्चात्मक संवाद साधून समजावले. त्यांच्या पालकांशीही या संदर्भात चर्चा केली. मुलांना या गोष्टीचे महत्त्व कळाले, त्यांनी पुन्हा प्रामाणिकपणे पेपर सोडवण्याचे ठरवले. जसजसे सराव होत गेले तशा काही गोष्टी लक्षात आल्या. विद्यार्थी पूर्ण प्रश्न न वाचताच अंदाज करून उत्तर काढतात. अवघड प्रश्नांवर आधी जास्त वेळ घालवतात. उत्तर एका प्रश्नाचे आणि गोल चुकून दुसराच रंगवतात किंवा गोल पूर्ण रंगवतच नाहीत. गोल रंगवताना गोलाच्या बाहेर जाणे, वेळ आणि प्रश्न यांची सांगड घालत नाहीत. अशा अनेक समस्या समोर आल्या. या

गोष्टी आटोक्यात आणण्यासाठी बरचे नियम मुलांना घालून दिले. थोडे जरी गोलाच्या बाहरे रगंवले किंवा गोल रगंवायचा राहला तर तो प्रश्न चूक द्यायला सुरुवात केली. आता मुलांनाही त्या सगळ्याचे गांभीर्य लक्षात येऊ लागले. गुण कमी होणार म्हणून ते काळजीने गोल रंगवू लागले.

शंभर सराव पेपर झाल्यानंतर मात्र मुलांचा आत्मविश्वास बराच वाढला, मुले स्वतःहून समोर येऊन प्रश्न सोडवू लागली. आता आमचा दिनक्रम बदलला, सुरुवातीला प्रश्नपत्रिका समजून द्यायला दोन-तीन तास जात होते, मात्र एका तासात चुकलेले प्रश्न समजून लिहून होऊ लागले, त्यामुळे एका दिवसात मुले चार पेपर सोडवू लागली. सकाळी ८ ते ९.२० वाचन, ९.३० ते ११.०० पहिला पेपर, अर्धा तास सुट्टी, ११.३० ते १.०० दुसरा पेपर त्यानंतर दहा-पंधरा मिनिटात पेपर तपासून गटावर विद्यार्थ्यांनी मिळवलेले गुण पाठवणे. दररोज रँडमली उत्तरपत्रिका तपासल्यामुळे विद्यार्थ्यांचे खरे गुण कळू लागले. सुरुवातीला सोप्या प्रश्नपत्रिका घेत घेत अवघड प्रश्नपत्रिकांपर्यंत पोहोचलो. आम्ही दोन वर्ग एकत्र करून काही सराव घेतले त्यात आम्ही दोन गट केले २०० पेक्षा जास्त गुण मिळवणाऱ्या मुलांचा गट आणि त्यापेक्षा कमी मार्क मिळवणाऱ्या मुलांचा गट. २०० पेक्षा जास्त गुण पडणाऱ्या मुलांच्या प्रश्नपत्रिकेचे स्पष्टीकरण लवकर संपवून त्यांना पुढची प्रश्नपत्रिका दिली जायची आणि २०० पेक्षा कमी मार्क मिळवणाऱ्या मुलांना मात्र पुन्हा सर्व प्रश्न बारकाईने समजून सांगून सोडून घ्यायचे असा आमचा दिनक्रम सुरू झाला.

दोनशेहून अधिक गुण मिळवण्याऱ्या मुलांच्या पालकांचा एक वेगळा गट तयार केला. त्यांच्या मदतीने पुन्हा एक प्रश्नपत्रिका सात ते साडेआठ या एकाच वेळेत सर्व मुलांना सोडवायला दिली जायची. मुलांनी तिथेही प्रामाणिक प्रयत्न करावा यासाठी पालकांची मदत घेतली. नऊ वाजता उत्तरपत्रिका गटावर पाठवून मग ती पालकांकडून तपासून घेतली त्यानंतर त्यातील चुकलेले प्रश्न पुन्हा सोडवायला सांगितले. २० घटकनिहाय प्रश्नपत्रिका व तब्बल १८० प्रश्नपत्रिकांचा सराव याप्रमाणे केला. अखेर १८ फेब्रुवारी, २०२४ चा दिवस उजाडला. उत्साह आणि त्यासोबत एक अनामिक भीतीने आमच्या मनात काहूर उठले होते. सर्वांचे आशीर्वाद घेऊन मुले पेपरला गेली. पहिला पेपर संपल्यानंतर मुलांनी आनंदाने उड्या मारत आमच्याकडे धाव घेतली. आमचा जीव भांड्यात पडला. पहिला पेपर सोपा गेल्यामुळे दुसराही असाच छान जाणार या उत्साहात असणाऱ्या मुलांना दुसरा पेपर मात्र त्यांच्या बुद्धिमत्तेची अग्निपरीक्षा घेणारा ठरला. स्वराज्यासाठी बाजीप्रभूंनी तन-मन-धन अर्पण करून पावनखिंडीत केलेली लढाई आणि शिष्यवृत्तीसाठी दीड तासात बुद्धीने प्रश्नांशी केलेली ही लढाई मला सारखीच वाटली. ३० एप्रिल, २०२४ रोजी शिष्यवृत्तीचा निकाल हातात आला.

**सुनिता पाटील**
**जि. प. प्राथ. शाळा धानोरे,**
**ता. खेड, जि. पुणे.**

◈◈◈

# कष्टाची वाट चालताना

*स्पर्धापरीक्षा म्हटले की, आठवते ती शिष्यवृत्ती*

*ध्येय, नियोजन, कार्यवाही आणि अभ्यासूवृत्ती*

राज्यातील प्रज्ञावान विद्यार्थ्यांचा शोध घेऊन त्यांच्या भावी शैक्षणिक वाटचालीस प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून शिष्यवृत्ती परीक्षा घेतली जाते. गुणवत्तेचे पैलू पाडणारी शिष्यवृत्ती परीक्षा आपण आजपर्यंत यशस्वीरीत्या घेत आहोत. आज उच्चपदस्थ व्यक्ती आपल्या आयुष्याच्या पायाभरणीत शिष्यवृत्ती परीक्षेचे महत्त्व अधोरेखित करतात. त्यामुळे जास्तीत जास्त विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत समाविष्ठ करण्याचा माझा व माझ्या सहकाऱ्यांचा सातत्याने प्रयत्न असतो.

पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा व पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत यश संपादित करण्यासाठी वर्ग ताब्यात मिळाल्यापासून केलेली अभ्यासपूर्व तयारी, अध्यापन व सराव यांचे नियोजन, संदर्भ व पूरक साहित्याची निवड, विद्यार्थ्यांची बौद्धिक, मानसिक व शारीरिक तयारी, पालकांचे उद्बोधन महत्त्वाचे ठरले. अंमलबजावणी करताना वेळेचे व्यवस्थापन शालेय वातावरण, वरिष्ठांचे मार्गदर्शन व सहकारी शिक्षकांची साथ या गोष्टी अतिशय उपयुक्त ठरतात. यावरच तुमची यशस्विता अवलंबून असते. यापूर्वी शिष्यवृत्ती वर्ग घेतला असल्यास तो अनुभवदेखील उपयोगी पडतो.

मेढा शाळेत शिष्यवृत्ती मार्गदर्शन करत असताना विषयानुरूप घटक, उपघटक, त्याला क्रमिक पुस्तकांची जोड दिली. इतर साहित्याची मदत, संदर्भ साहित्यांचा मेळ, तज्ज्ञ राज्य मार्गदर्शकांचे अनमोल मार्गदर्शन, शाळेच्या वेळी सकाळी जादा तास व सुट्टीच्या दिवशी तासिका घेऊन अध्यापनास सुरुवात केली. याचीच फलनिष्पत्ती म्हणजे पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती २०२० मध्ये १० विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले. त्यापैकी चार विद्यार्थी राज्य यादीत चमकले. २०२३ मध्ये पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेत सहा विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्ती मिळवली. दोन विद्यार्थी राज्य यादीत चमकले. शिष्यवृत्तीतील या यशामुळे पालक, ग्रामस्थ, सहकारी शिक्षक व प्रशासकीय अधिकारी यांनी कौतुक केले. शाळेचे तत्कालीन मुख्याध्यापक शेलार सरांनी विद्यार्थ्यांना बक्षीस जाहीर करून त्यांचा सत्कार केला यामुळे विद्यार्थ्यांना प्रोत्साहन मिळाले. पंचायत समिती जावळीचे गटशिक्षणाधिकारी मा. श्री. संजय धुमाळ, शिक्षण विस्तार अधिकारी मा. कल्पना तोडरमल, चंद्रकांत कर्णे व केंद्रप्रमुख अलका संकपाळ यांच्या मार्गदर्शक सूचना व प्रेरणादायी वातावरणामुळे शिष्यवृत्ती वर्गासाठी धडपडण्याची आवड व जिद्द निर्माण झाली.

**अध्यापनाचे वेळापत्रक :**

शाळा भरण्यापूर्वी दीड तास व सुट्टीच्या दिवशी पूर्ण वेळ जादा तासिका घेतल्या. पालक व विद्यार्थी यांच्यामध्ये सहकार्याचे व आनंदाचे वातावरण निर्माण केले. पालकांनी संदर्भ साहित्य खरेदी करण्यासाठी वर्षाच्या सुरुवातीला आर्थिक मदत केली. अभ्यासक्रमाचे वार्षिक नियोजन करून माहे ऑक्टोबरपर्यंत अभ्यासक्रम पूर्ण केला. तालुक्यातील शिष्यवृत्तीच्या वर्गास शिकवणाऱ्या शिक्षकांचा गट करून जिल्ह्यातील उत्कृष्ट निकाल लागणाऱ्या शाळांना भेटी दिल्या. तेथील शिक्षकांचे मार्गदर्शन घेतले. विषयनिहाय संक्षिप्त टिपण तयार केल्या. प्रश्ननिर्मिती व सरावासाठी तालुका प्रशासनाचे सहकार्य लाभले.

**शिष्यवृत्ती वर्गासाठी केलेले नियोजन :**

इयत्ता पाचवी शिष्यवृत्ती पूर्वतयारी चौथीमध्ये, तर इयत्ता आठवी शिष्यवृत्ती पूर्वतयारी सातवीपासूनच घेतली. विविध स्पर्धापरीक्षांसाठी विद्यार्थी प्रविष्ट करून त्यांना मार्गदर्शन केले. पहिल्यापासून वाचनाची आवड निर्माण केली. त्यामुळे शब्दसंपत्तीत वाढ झाली. क्रमिक पाठ्यपुस्तकांबरोबरच अवांतर कविता व वाचनिय पुस्तके वाचून घेतली. शिकवून झालेल्या अभ्यासक्रमावर साप्ताहिक, पाक्षिक व मासिक सराव घेतले. अभ्यासातील गुणदान पालकांच्या निदर्शनास आणून दिले. वेळोवेळी त्यांच्या प्रगतीचे कौतुक करून बक्षीस दिले. शेवटच्या दोन-तीन महिन्यात सरावावर अधिक भर दिला. विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासाबरोबर शारीरिक व मानसिक विकास होण्यासाठी खेळसुद्धा घेतले. आरोग्य चांगले राहण्यासाठी आहार व झोप या बाबींवर कटाक्षाने लक्ष ठेवण्यास पालकांना सुचित केले. विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास वाढवण्यासाठी ज्या केंद्रावर परीक्षा होणार आहे त्या ठिकाणी अभिरूप सराव घेतले. त्यामुळे त्यांच्या मनातील परीक्षेविषयीची भीती दूर झाली.

**संदर्भ साहित्य :**

१) पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षा मार्गदर्शिका

२) क्रमिक पाठ्यपुस्तके (अभ्यासक्रम)

३) शिष्यवृत्ती परीक्षेचे मागील वर्षाचे सरावसंच

४) बालभारती कविता

५) सराव संच

६) इतर पूरक साहित्याचा सराव

**शिष्यवृत्तीतील शाळेची कामगिरी :**

शिष्यवृत्ती वर्गासाठी जावळी तालुका शिष्यवृत्ती विभागाच्या वतीने ऑनलाइन, ऑफलाइन सरावसंच पद्धतीने घेण्यात येतात. सरावातील गुणांकनावरून Talent batch निवडली जाते. त्यांना राज्य मार्गदर्शक मार्गदर्शन करतात. त्यामुळे विद्यार्थ्यांना योग्य दिशा मिळते व त्याचा खूप फायदा होतो. याचाच परिपाक म्हणून

आमचे जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श केंद्र शाळा मेढा शाळेने उत्कृष्ट कामगिरी केली. गत पाच वर्षांत सन २०२० मध्ये इयत्ता पाचवीचे १०, सन २०२१ मध्ये पाचवीचे ९, सन २०२२ मध्ये पाचवीचे ७ व इयत्ता आठवीचे ४, सन २०२३ मध्ये पाचवीचे ८ व आठवीचे ६ व सन २०२४ मध्ये इयत्ता आठवीचे ७ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक झाले. दोन्ही शिष्यवृत्ती परीक्षेत उत्तीर्ण होण्याची टक्केवारी देखील उत्तम आहे. याचे श्रेय माझ्या शाळेतील जिद्दीने काम करणारे शिक्षकवृंद, सहकार्यशील पालक, मार्गदर्शक अधिकारी वर्ग व शाळा व्यवस्थापन समिती यांना जाते.

**समीर आगलावे**

**जि. प. प्राथ. आदर्श केंद्र शाळा मेढा,**

**ता. जावळी, जि. सातारा.**

◈◈◈

# आमची नवी वाट


जि. प. प्राथमिक शाळा बोरगव्हाण, ता. पाथरी, जि. परभणी ही जिल्ह्यातील आदर्श शाळांपैकी एक शाळा होय. मागील चार ते पाच वर्षांपासून माझ्या शाळेने वेगवेगळ्या स्पर्धापरीक्षांमध्ये आपला ठसा उमटविला आहे. आमचे प्रेरणास्थान व मार्गदर्शक शाळेचे मुख्याध्यापक गिलडा सर यांच्या मार्गदर्शनाखाली ही घोडदौड सुरू आहे.

आमच्या शाळेत स्पर्धापरीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचा प्रवास तिसरीपासून सुरू होतो. तिसरीमध्ये विद्यार्थी आल्यानंतर त्याची गुणवत्ता पाहून स्पर्धापरीक्षेसाठी निवड केली जाते. या परीक्षांची तयारी घेतल्यामुळे त्या विद्यार्थ्यांची नवोदय, शिष्यवृत्ती परीक्षेची पूर्वतयारी होते. इयत्ता तिसरी व चौथीमधील विद्यार्थ्यांना पालदेवार मॅडम, जाधव मॅडम, थोरात मॅडम, भोज सर मार्गदर्शन करतात.

इयत्ता तिसरी व चौथीमध्ये वेगवेगळ्या स्पर्धापरीक्षांचा सराव दिल्यामुळे त्या विद्यार्थ्यांची पाचवीला आल्यानंतर नवोदय, शिष्यवृत्तीसाठी तयारी करून घेणे आम्हाला सोपे जाते. याचे फलित म्हणजे पाचवी शिष्यवृत्तीमध्ये सुद्धा आमच्या शाळेतील विद्यार्थी चांगली कामगिरी करत आहेत. आमच्या शाळेतील वाघमारे मॅडम, किरकिरे सर हे पाचवी नवोदय व शिष्यवृत्ती या परीक्षांची तयारी करून घेतात.

**स्पर्धापरीक्षा निकाल**

**२०२०-२१ ते २०२३-२४**




आठवी एनएमएमएस आणि शिष्यवृत्ती या परीक्षेसाठी तयारी केली जाते. एनएमएमएस परीक्षा दर वर्षी साधारणतः डिसेंबर महिन्यात होत असते. त्यामुळे या परीक्षेची तयारी करण्यासाठी कमी वेळ मिळतो. एनएमएमएस परीक्षेच्या तयारीसाठी भरपूर वेळ मिळावा यासाठी १ मार्च पासूनच म्हणजे ते विद्यार्थी सातवीम

ध्ये असतानाच तयारी सुरू करतो. १ मार्चपासून तयारी सुरू केल्यामुळे आम्हाला एनएमएमएस या परीक्षेची तयारी करण्यासाठी नऊ महिन्यांचा कालावधी मिळतो. मागील पाच वर्षांपासून प्रत्येक विषयासाठी एका तज्ज्ञ शिक्षकांची निवड केलेली आहे. सातत्याने एकच विषय शिकवल्यामुळे शिक्षक त्या विषयात पूर्ण पारंगत होतात. एनएमएमएस परीक्षेमध्ये SAT आणि MAT या दोन पेपरचा समावेश होतो. SAT मध्ये विज्ञान, इतिहास, भूगोल, नागरिकशास्त्र व गणित या विषयांचा समावेश होतो.

प्रत्येक पाठ शिकवल्यानंतर लगेच त्या विषयाची परीक्षा घेतली जाते. सराव परीक्षा ही शक्यतो सुट्टीच्या दिवशी घेतली जाते. सराव परीक्षेचे निकाल व्हॉट्सअॅप गटावर पाठवले जातात त्यामुळे पालकांनादेखील आपल्या मुलांची प्रगती समजते. एनएमएमएस या परीक्षेसाठी दुसरा महत्त्वाचा विषय म्हणजे MAT त्यालाच आपण बुद्धिमत्ता चाचणी म्हणतो. बुद्धिमत्ता विषयाची तयारी करत असताना सरावावर विशेष लक्ष दिले जाते. बुद्धिमत्तेचा घटक शिकवल्यानंतर भरपूर उदाहरणे त्यांना व्हॉट्सअॅप गटावर सरावासाठी दिले जातात. त्यातून त्यांची बुद्धिमत्ता या विषयाची चांगली तयारी होते.

या नियोजनबद्ध तयारीमुळेच २०२०-२१ पासून सातत्याने आमचे विद्यार्थी आठवी स्पर्धापरीक्षेत चांगले यश मिळवत आहेत. आतापर्यंत आम्ही विद्यार्थ्यांना ५१ लाख, ५४ हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळवून देऊ शकलो. आठवी एनएमएमएस शिष्यवृत्तीसाठी बसवलेल्या विद्यार्थ्यांनाच पुढे नववी आणि दहावीसाठी वेगवेगळ्या स्पर्धापरीक्षेला बसवले जाते. नववी आणि दहावीसाठी आमच्या शाळेत IMO, NSO, डॉ. होमी भाभा या परीक्षेची तयारी करून घेतली जाते. गेल्या वर्षी आमच्या तीन विद्यार्थ्यांनी IMO परीक्षेत गोल्ड मेडल मिळवले आहे. वर्ग आठवी ते दहावीमधील विद्यार्थ्यांच्या घेतल्या जाणाऱ्या स्पर्धापरीक्षेसाठी निपाणीकर सर, राऊत सर, चव्हाण सर, नखाते मॅडम, धनले सर, चौधरी सर, टेकाळे सर हे शिक्षक मार्गदर्शन करतात.

अशा प्रकारे आमच्या शाळेत एका विद्यार्थ्याचा इयत्ता तिसरीपासून सुरू झालेला प्रवास दहावीला संपतो. आमच्या शाळेतील तिसरी ते दहावीमधील विद्यार्थी वेगवेगळ्या स्पर्धापरीक्षांमध्ये यशस्वी होत आहेत. हे सर्व शक्य आहे. सर्व शिक्षकांच्या सामुदायिक जबाबदारीमुळेच.

**पृथ्वीराज धर्मे**

**जि. प. प्राथ. व माध्य. शाळा बोरगव्हाण,**

**ता. पाथरी, जि. परभणी.**

# प्रयत्नांची पराकाष्ठा

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ च्या पूर्वमाध्यमिक शिष्यवृत्ती परीक्षेचा निकाल जाहीर झाला आणि आमच्या शाळेतील १८ मुले गुणवत्ता यादीत पात्र झाली हे बघून खूप आनंद झाला. शाळेसाठी ही अभिमानाची गोष्ट होती. यश आमच्यासाठी नवीन नक्कीच नव्हते, पण मोठे यश मिळवायचे ध्येय बाळगून आम्ही काम करत होतो. शिष्यवृत्ती परीक्षेसाठी विद्यार्थ्यांचा जो गट आम्ही निवडला होता तो सुरुवातीपासून एकहाती अन निश्चित ध्येय ठेवून पुढे आणलेला गट होता. तिसरीपासूनच या गटाला स्पर्धापरीक्षेतील बारकाव्यांची माहिती द्यायला आम्ही सुरुवात केली होती. पहिल्यापासून गणित विषयाकडे जाणून बुजून अधिक लक्ष दिले. सर्वप्रथम विविध उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये गणिताची आवड निर्माण केली. त्यानंतर ठरवलेल्या ध्येयाकडे वाटचाल करण्याचा आमचा एक जिद्दीचा प्रवास सुरू झाला.

शाळेतील तिसरी व चौथीमधील जवळपास ३० मुलांमध्ये विविध विषयांच्या संपादणुकीत नेहमीच कमालीची चुरस असायची. ही बाब हेरून आम्ही चौथीची सत्र दोनची परीक्षा संपल्यानंतर उन्हाळ्याच्या सुट्टीत सकाळी ७.३० ते ११.३० या वेळेत स्पर्धापरीक्षेचे तास घेणे सातत्याने सुरू ठेवले.

उन्हाळ्यात गणित विषयाचा ७५ टक्के अभ्यासक्रम संपवला. दररोज सोबतीला मराठीचे पाठांतर. त्यानंतर ८ दिवस मुलांना तणावमुक्त होण्यासाठी सुट्टी दिली. नंतर शाळा चालू झाल्यावर आम्ही सर्व सहकारी नियमितपणे कामाला लागलो. प्रत्येक विषयाचा अभ्यासक्रम दिवाळीच्या आसपास पूर्ण झाला. त्यानंतर नवोदयची परीक्षा जवळ आल्यामुळे त्याच्याकडे अधिक लक्ष दिले. दीड महिना शिष्यवृत्ती परीक्षेच्या तयारीला थोडा विश्राम देऊन नवोदय परीक्षेचा भरपूर सराव घेण्यात आला. सातत्य आणि सराव यामुळे नवोदय परीक्षेतही शाळेतील तीन विद्यार्थ्यांची निवड झाली. ९० गुणांच्या पुढे १० ते १२ विद्यार्थी होते, पण निवड यादी जास्त गुणांची लागल्याने तीन विद्यार्थ्यांची निवड झाली.

नवोदय परीक्षेचा हंगाम संपवून आम्ही पुन्हा आमच्या मूळ ध्येयाकडे वळलो. शिष्यवृत्ती परीक्षेचे सराव सत्र सुरू झाले. प्रत्येक विषयाची परीक्षा झाली की, प्रश्नपत्रिका तपासून प्रत्येक प्रश्नाचे स्पष्टीकरण सुरू केले. जास्तीत जास्त प्रश्नपत्रिका सोडवून घेऊन मुलांच्या वेळेनुसार त्याचे स्पष्टीकरण व सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. विद्यार्थ्यांच्या वारंवार होणाऱ्या चुका शोधून त्यावर उपाययोजना केल्या.

एकंदरीत सांगायचे म्हटले तर आमच्या सहकारी शिक्षकांनी प्रचंड कष्ट घेतले, खूप खोलवर प्रत्येक गोष्ट मुलांमध्ये रुजवला, संकल्पना स्पष्ट केल्या. जसा पाचवीच्या मुलांचा नित्यक्रम तसाच आठवीच्याही मुलांचा नित्यक्रम चालू असायचा. शाळेत गेली पंचवीस वर्षे काम करणारे डोके सर, सरवदे सर या शिक्षकांचे काम बघून आम्हाला प्रेरणा मिळायची. आठवीचेही १६ विद्यार्थी शिष्यवृत्ती परीक्षेत गुणवत्ताधारक झाले.

उन्हाळ्याच्या सुट्टीत आणि दिवाळीच्या सुट्टीत एकही दिवस न चुकवता केलेले कष्ट कामी आले. सर्वांत महत्त्वाचे कधीही कुरकुर न करता तेवढ्याच उत्साहाने अभ्यास करणारे आमचे विद्यार्थी नक्कीच कौतुकास पात्र आहेत.

एकंदरीत इयत्ता तिसरीपासून असलेले आमच्या शाळेतील नियोजन, प्रत्येक इयत्तेला असलेला स्पर्धापरीक्षेचा शिक्षकांचा वेगळा गट, प्रचंड मेहनत व सातत्याने प्रयत्न याबाबी आमच्या यशाचे गुपित आहे.

या यशात आमच्या शाळेतील उपक्रमशील शिक्षक पांढरे सर व त्यांचे सर्व सहकारी यांची मेहनत खूप उल्लेखनीय आहे. केंद्रप्रमुख खताळ सर, मुख्याध्यापक टेकळे सर यांचे मिळालेले प्रोत्साहन खूप महत्त्वाचे आहे. सुट्टीत तास चालू असले की, दोघांनीही अधूनमधून वर्गात येऊन वर्ग अनुधावनाच्या निमित्ताने केलेली आपुलकीची विचारपूस आमच्यासाठी प्रेरणा देणारी ठरली. आम्हांला वारंवार प्रेरणा देणारे विस्तार अधिकारी शिंदे सर, गटशिक्षणाधिकारी महाडिक सर यांचेही मोलाचे सहकार्य व मार्गदर्शन मिळाले.

''बुद्धीच्या कॅमेऱ्यात विचारांचा रोल घालून प्रयत्नांचे बटण दाबले की, यशाचा सुंदर फोटो नक्की निघतो.''

**अनिरुद्ध पांढरे**

**पीएमश्री जि. प. आदर्श प्राथ. शाळा पापरी,**

**ता. मोहोळ, जि. सोलापूर.**

# गुणवत्तेची भरारी...

जगात कोणत्याही यशामागे निश्चित असे नियोजन, कष्ट, त्याग व मेहनत असते. जिल्हा परिषद प्राथमिक आदर्श शाळा, बालमटाकळी ही अहमदनगर जिल्ह्यातील १५ आदर्श शाळांपैकी एक शाळा! ग्रामीण भागातील आव्हाने विचारात घेऊन आमच्या शाळेने शिष्यवृत्ती व नवोदय या दोन्ही स्पर्धापरीक्षांची तयारी सुरू केली. शाळेत सन २०१९–२० पर्यंत पहिली ते चौथीपर्यंतचे वर्ग होते. पाचवीचा वर्ग शाळेत नसल्यामुळे शाळेतील प्रज्ञावंत विद्यार्थ्यांसाठी वेगळी संधी देता येत नव्हती. शाळेतील सर्व सहकाऱ्यांनी मिळून इयत्ता पाचवीचा वर्ग सुरू करण्याचे ठरविले. योग्य नियोजन करून अंमलबजावणी केली. शाळेतील ज्येष्ठ व तज्ज्ञ शिक्षक श्री. कल्याण पोटभरे व सर्व शिक्षकांनी इयत्ता पाचवीच्या वर्गाला आकार देण्याचे कार्य केले.

सन २०१९–२० ला पहिल्याच प्रयत्नात शाळेतील दोन विद्यार्थ्यांची नवोदय विद्यालयासाठी निवड झाली. हे यश खूपच आनंददायी व प्रेरणादायी होते, शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये एकही विद्यार्थी गुणवत्ता यादीत चमकला नव्हता याचे दुःख पण होते. अवघ्या २ गुणांनी गुणवत्ता यादीतील स्थान हुकले होते. म्हणून कारणांचा विचार करून योग्य रीतीने प्रयत्न करावे लागतील याची जाणीव सर्व शिक्षकांना झाली. त्या दृष्टीने प्रयत्न केले. प्रयत्न आणि अभ्यासपूरक उपक्रमांना पुढे यश मिळत गेले.

सन २०१९–२० ते सन २०२३–२४ अखेर आमच्या शाळेतील ६ विद्यार्थी नवोदय विद्यालयासाठी पात्र झाले, १४ विद्यार्थी शिष्यवृत्तीच्या जिल्हा गुणवत्ता यादीमध्ये झळकले. शिष्यवृत्ती पात्र विद्यार्थ्यांची संख्या तर खूप आहे. या उज्ज्वल यशामागे अखंड मेहनत, कष्ट आणि उपक्रमांचे नियोजन व अंमलबजावणी हे आहेत.

**नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षांसाठी खालीलप्रमाणे नियोजन व उपक्रम राबविले गेले.**

इयत्ता पाचवीची विशेष जबाबदारी शाळेतील अभ्यासू व्यक्तिमत्त्व पोटभरे सर यांच्याकडे देण्यात आली. शाळेत विद्यार्थ्यांची संख्या वाढत गेल्याने शाळेतील शिक्षक कर्दळ सर व प्रीतम बैरागी यांचेवर सहकारी शिक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली. इयत्ता पाचवीमध्येच नवोदयची ओळख होण्यापेक्षा पहिलीपासूनच पूर्वतयारी सुरू केली. यासाठी सर्व शिक्षक विद्यार्थ्यांसाठी शाळेव्यतिरिक्त एक ते दीड तास जास्तीचा वेळ देतात. याचा फायदा इयत्ता पाचवीमध्ये विद्यार्थ्यांना होतो. अहमदनगर जिल्ह्यात आदरणीय मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेमार्फत सुरू करण्यात आलेल्या मिशन आरंभ या उपक्रमाचादेखील फायदा होताना दिसून येत आहे.

पाचवीचा वर्ग भरण्याची वेळ सकाळी ९.०० वाजता केली. उन्हाळी व दिवाळी सुट्ट्यांचा विशेष उपयोग करून घेण्यात आला. उन्हाळी सुट्टीमध्ये रोज सकाळी ७.०० ते ११.०० या कालावधीत मार्गदर्शन व सराव घेण्यात आला. मेअखेर विद्यार्थ्यांना आठ दिवस सुट्टी देऊन १ जूनला पाचवीचा वर्ग सुरू होतो. विशेष म्हणजे दिवाळीपूर्वी शालेय अभ्यासक्रमदेखील पूर्ण केला जातो. दीपावलीची सुट्टीदेखील नाममात्रच देण्यात येते.

विविध प्रकाशनांच्या परीक्षांचे आयोजन रविवारच्या दिवशी करण्यात येते. उत्तरपत्रिका तपासून विद्यार्थ्यांना त्यांच्या चुकांबाबत प्रत्याभरण देण्यात येते. अधिकाधिक प्रश्नपत्रिका सोडवून घेण्यावर भर दिला जातो. त्यामुळे शिष्यवृत्ती व नवोदयमधील संकल्पनांमध्ये अधिकाधिक अचूकता येण्यास मदत होते.विद्यार्थ्यांना सरावाबरोबर नवोदय व शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांसोबत चर्चा घडवून आणली जाते. इंग्रजी व गणित विषयाला प्रश्नमंजूषा उपक्रमामुळे चालना मिळते. विद्यार्थ्यांचे पाढे, वर्गसंख्या, घनसंख्या, सूत्रे यांसारख्या संकल्पना दृढ होतात.

हे सर्व कामकाज सुरू असताना कर्तव्यदक्ष विस्ताराधिकारी डॉ. गाडेकर, केंद्रप्रमुख भांगरे यांच्या शाळेतील भेटी शिक्षक व विद्यार्थ्यांना ऊर्जा देऊन जातात. शेवगाव तालुक्याचे गटविकास अधिकारी कदम व गटशिक्षणाधिकारी कोलते मॅडम यांचेही शिक्षकांना सदैव मार्गदर्शन व प्रेरणा लाभते.

'माझी शाळा' या भावनेने काम करणाऱ्या शाळेच्या मुख्याध्यापिका कवडे मॅडम यांचे मार्गदर्शन तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे पदाधिकारी यांचे अनमोल सहकार्य शाळेस सतत लाभते. बालमटाकळी गावचे सर्व ग्रामस्थ, ग्रामपदाधिकारी यांचे या प्राथमिकतेने नेहमीच शाळेस योगदान लाभते. शाळेचा आधार म्हणजे सर्व शिक्षक बंधू-भगिनी! यांचेदेखील सहकार्य महत्त्वाचे ठरते.

भविष्यात देखील आमची शाळा नवनवीन उपक्रम राबवणार आहे, मिळालेल्या यशावर समाधान न मानता आणखी सर्वोच्च यश मिळविण्यासाठी आमचे प्रयत्न सदैव सुरूच राहतील.

**बैरागी दिगंबर**

**जि. प. प्राथ. आदर्श शाळा बालमटाकळी,**

**ता. शेगाव., जि. अहमदनगर.**

◈◈◈

# वाटा यशाच्या

दिनांक ११ जुलै, २०२४ रोजी पुणे जिल्हा परिषद आयोजित शिष्यवृत्ती मार्गदर्शक शिक्षक गुणगौरव कार्यक्रमात पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या भाषणात एक वाक्य ऐकले, की गुणवत्ता ही कोणाची मक्तेदारी नाही आणि झटकन एक चेहरा डोळ्यांसमोर आला. तो चेहरा होता एका शालाबाह्य मुलाचा – ओंकार देवकुळे या एका शेतमजुरी करून जीवनाशी संघर्ष करणाऱ्या महिला पालकाच्या पाल्याचा. त्याचाच चेहरा डोळ्यांसमोर का यावा? कारण त्याने सिद्ध करून दाखवले होते, की गुणवत्ता ही ग्रामीण–शहरी, श्रीमंत–गरीब, उच्च–नीच अशा कोणाचीही मक्तेदारी असू शकत नाही, तर ती असते प्रयत्न, जिद्द व दुर्दम्य इच्छाशक्ती असलेल्या प्रत्येकाची. सन २०२१ –२२ हे शैक्षणिक वर्ष चालू होते. माझ्याकडे इयत्ता आठवीचा शिष्यवृत्तीचा वर्ग होता व त्याचबरोबर आमच्या शाळेतील पाचवी शिष्यवृत्ती चा वर्ग श्री. गोरख काळे सर व सौ. प्रतिभा काळे मॅडम यांच्याकडे होता. शिष्यवृत्तीच्या सराव पेपरसाठी पाचवीचा वर्ग शाळेजवळ असलेल्या वडजाई मातेच्या मंदिराजवळ बरेचदा भरायचा. त्याच वेळी काळे सरांच्या लक्षात आले, की एक मुलगा मंदिराभोवती घुटमळताना दिसतो आहे. एके दिवशी सरांनी त्याची विचारपूस केली, तर तिसरीतून शाळा सोडलेला तो विद्यार्थी गेली तीन वर्षे शाळेपासून लांब होता, परंतु शाळेत शिकण्याची त्याला ओढ होती.

दुसऱ्या दिवशी त्याच मुलाला घेऊन वाबळे हे ग्रामस्थ काळे सरांकडे आले व त्यांनी सांगितले, की आमच्याकडे मजुरीसाठी एक कुटुंब आले आहे. त्या कुटुंबातील हा मुलगा असून तो दिवसभर इकडे तिकडे फिरत असतो. हे कुटुंब किती दिवस येथे राहील काही खात्री नाही, पण तोपर्यंत त्याला वर्गात बसू द्या. जर ते या ठिकाणी राहिले तर नंतर आपण त्याचा दाखला जुन्या शाळेतून मागवून घेऊ. सरांनी त्याला वर्गात बसवले. तो आवडीने दररोज शाळेत येऊ लागला. दोन महिने सरांच्या वर्गात बसला. हळूहळू त्याची वाचनगती वाढली, तो गणितीक्रिया करू लागला. ते शैक्षणिक वर्ष संपले. ओंकार चांगल्या प्रकारे वाचायला, लिहायला शिकला होता.

२०२२–२३ हे शैक्षणिक वर्ष चालू झाले, परंतु कोरोना साथीच्या आजारामुळे अद्यापही आठवीच्या वर्गाची एनएमएमएस व शिष्यवृत्ती परीक्षा झाली नव्हती. म्हणून मी एक जून २०२२ पासून आठवीतून नववीत गेलेल्या मुलांचे जादा तास चालू केले. १९ जूनला एनएमएमएस परीक्षा झाली, परंतु स्कॉलरशिप परीक्षा अजून बाकी होती. आमची शाळा आठवीपर्यंत असल्याने २०२२–२३ या वर्षात मला पलांडे सरांनी इयत्ता सातवीचा वर्ग दिला. इयत्ता आठवीची स्कॉलरशिपची तयारी, इयत्ता सातवीचा वर्ग व मुख्याध्यापकांनी पलांडे सरांकडे नव्याने दिलेला इयत्ता पहिलीचा वर्ग अशा तीन वर्गांवर आम्हा दोघा उभयतांची तारेवरची कसरत चालू होती.

अखेर जुलैला शिष्यवृत्तीची परीक्षा झाली. मी पूर्णपणे आता सातवीच्या वर्गाकडे माझा मोर्चा वळवला. दरम्यानच्या काळात मुख्याध्यापक श्री. विठ्ठल पवार यांनी ओंकारच्या जुन्या शाळेतून दाखला मागवावा असे

सांगितले. दाखला मिळाला त्या वेळी ओकांरला वयानुरूप इयत्ता सातवीच्या वर्गात प्रवेश दिला व ओंकार ही खऱ्या अर्थाने माझी जबाबदारी बनला.

स्वतःचे नाव 'ओमकार' असे लिहिणारा तो भविष्यात काहीतरी उल्लेखनीय करू शकतो यावर त्या वेळी कोणाचाही विश्वास बसला नसता. वर्गात शिकविताना ''अभ्यासात मागे असणाऱ्या मुलांकडे जास्त लक्ष द्यायचे.'' ही सवय असल्यामुळे आपोआपच ओंकारकडे माझे जास्त लक्ष जाऊ लागले. दिवसभर मोकळे हुंदडण्याची सवय असलेल्या ओंकारला ते जड जाऊ लागले हे माझ्या लक्षात आले कारण त्याला वर्गातल्या अभ्यासापेक्षा वर्गाच्या बाहेरची कामे जास्त आवडत असत. माझ्यापुढे आव्हान होते ओंकारला अभ्यासाची गोडी लावून त्याच्या मनात जिद्द निर्माण करण्याचे.

हे सर्व करत असताना त्याची कौटुंबिक पार्श्वभूमी समजावून घेतली, तर प्रचंड कठीण परिस्थितीचा सामना करून तो शाळेत येत होता. वडिलांचा आधार नाही म्हणून त्याची लहान बहीण, आई हे आजीच्या आधाराने वाबळेवाडीत राहत होते. आई मजुरी करून मुलांचे पोट भरत होती. त्यामुळे त्या माऊली पुढे मुलांच्या शिक्षणापेक्षा उदरनिर्वाहाचा प्रश्न महत्त्वाचा होता. हे समजल्यानंतर मन गलबलून गेले आणि त्याच क्षणी ठरविले की, ओंकारला एनएमएमएस ची ६० हजार रुपयांची शिष्यवृत्ती मिळवून द्यायचीच, किमान त्याचे पुढचे शिक्षण तरी सुलभ होईल.

इयत्ता ७ वी चे वर्ष संपले आणि चालू झाली मिशन एनएमएमएस ची तयारी. ओंकारकडून रोजच्या रोज अभ्यास करून घेऊ लागले. दररोजच्या सराव चाचण्या व त्यात मिळणारा ओंकारचा प्रतिसाद बघून पलांडे सर व माझ्या आम्हा दोघांच्याही आशा पल्लवीत झाल्या. सराव पेपर चालू झाल्यानंतर चुकलेले प्रश्न, गणिते सोडविणे या त्याच्या प्रत्येक गोष्टीवर आम्हा दोघांची सूक्ष्म नजर होती. वेळोवेळी त्याला प्रेरणा देणे, वेगवेगळी पुस्तके वाचायला देणे, प्रत्येक टप्प्यानंतर गुणांची सरासरी कितीने वाढली हे सर्व सांगून वेळोवेळी वर्गात सर्वांसमोर त्याचे कौतुक करणे या गोष्टी आम्ही करत होतो. ओंकारही मन लावून प्रयत्न करत होता. एनएमएमएस परीक्षेचे फॉर्म भरायला चालू केले, तर ओंकारचे बँकेत खाते नव्हते. ते काढण्यासाठी लागणारी कागदपत्रेदेखील त्याच्या कुटुंबाजवळ नव्हती. मोठा गहन प्रश्न निर्माण झाला होता. त्या वेळी पुन्हा एकदा मदतीला धावून आले त्याचे घरमालक, त्यांना बोलावून सर्व परिस्थिती समजावून सांगितली व त्यांनी स्वतः बँकेत जाऊन हे कुटुंब माझ्याकडे रहिवासी आहे असा लेखी पुरावा देऊन व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करून बँकेत खाते सुरू करण्यास सहकार्य केले, नंतर ओंकारचा फॉर्म भरला. परीक्षेची तयारी सकाळी ८.३० ते संध्याकाळी ६.३० अशी चालूच होती. अखेर परीक्षेचा दिवस उजाडला. सर्व विद्यार्थ्यांनी पेपर छान सोडवले.

पुढे स्कॉलरशिपची परीक्षा होती. ती तयारी चालू झाली. स्कॉलरशिपचे फॉर्म भरताना ओंकारचाही फॉर्म भरला, परंतु तो विहित वयोमर्यादेपेक्षा जास्त वयाचा असल्यामुळे त्याला स्कॉलरशिप मिळणार नव्हती, पण परीक्षा देता येणार होती. त्याचीही तयारी मन लावून चालू होती. पुढे स्कॉलरशिप परीक्षा ही झाली.

१३ एप्रिल, २०२४ रोजी एनएमएमएस परीक्षेचा निकाल लागला. वर्गातील ४१ पैकी ४० विद्यार्थी पात्र ठरले होते, तर ३४ विद्यार्थ्यांची शिष्यवृत्तीसाठी निवड झाली होती. तर ४ विद्यार्थ्यांना सारथी शिष्यवृत्ती मिळाली होती. या सर्व आनंदात सर्वांत मोठी आनंदाची गोष्ट म्हणजे ३ वर्षे शाळेत न गेलेला आमचा ओंकार देवकुळे १८० पैकी १३१ गुण मिळवून खुल्या प्रवर्गातून एनएमएमएस च्या गुणवत्ता यादीत आला होता आणि ६०,००० रुपये शिष्यवृत्तीचा मानकरी ठरला होता. पुढे शिष्यवृत्ती परीक्षेचा ही निकाल जाहीर झाला. १७८ गुण मिळवून ओंकारने याही परीक्षेत स्वतःला सिद्ध केले. वीस वर्षांतील शैक्षणिक प्रवासात जे काही आनंदाचे आणि समाधानाचे क्षण आले त्यात हा एक अविस्मरणीय क्षण होता.

**जयश्री पलांडे**

**जि. प. प्राथ. शाळा वाबळेवाडी,**

**ता. शिरूर जि. पुणे**

# प्रयत्नांती यश

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कळस (बु.), ता. अकोले, जि. अहमदनगर या शाळेमध्ये १२ ऑगस्ट, २०१४ ला आंतरजिल्हा बदलीने मी सेवेत रुजू झाले. कळस (बु.) म्हणजे अकोले तालुक्याचे प्रवेशद्वार, प्रवरामाईच्या तीरावर वसलेले वनराईने नटलेले आणि त्याच्या पायथ्याशी ज्ञानदानाचे कार्य करणारी कळस (बु.) शाळा. अत्यंत सुंदर इमारतीत भरणारी जिल्हा परिषदेची शाळा. प्रथमदर्शनी पाहणारा कोणीही थक्क व्हावा इतकी अप्रतिम. ज्या शाळेबद्दल आजपर्यंत ऐकून होते. त्या शाळेची मी पण आजपासून घटक बनणार होते हे माझे भाग्यच होते. अशा शाळेत काम करण्याची संधी मला मिळाली.

*ही आवडते मज, मनापासूनी शाळा*
*लाविते लळा, जशी माऊली बाळा*

ही उक्ती प्रत्येक बाबतीत खरी होती. लोकसहभागातून शाळेचा विकास या ध्येयाने प्रेरीत झालेले कळस (बु.) येथील ग्रामस्थ, पालक व शिक्षक यांनी शाळेचा सर्वांगीणदृष्ट्या कायापालट केला.

स्पर्धापरीक्षांच्या अभ्यासातून मिळणारे ज्ञान विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणते. त्यादृष्टीने स्पर्धापरीक्षेची उत्तम तयारी करण्याकडे विशेष लक्ष देते. ५ वी चा वर्ग म्हणजे, शाळेत शिक्षकांच्या कसोटीचा काळ. दरवर्षी शाळेची मुले 'नवोदय' शिष्यवृत्ती परीक्षेत घवघवीत यश संपादन करतात. हे शिवधनुष्य मला पण उचलायचे होते. सुरुवातीला दडपण होते व मनाची तयारी केली. विद्यार्थ्यांमध्ये सकारात्मक ऊर्जा निर्माण केली. वर्षभराचे नियोजन केले आणि वर्षभर फक्त त्यावरच लक्ष केंद्रित केले.

उन्हाळ्याच्या सुट्टीत २५ मे, २०२३ पासून शिष्यवृत्तीच्या तासाला सुरुवात केली. प्रत्येक रविवारीदेखील तास सुरू असायचे, सणांचीसुद्धा सुट्टी घेतली नाही. शाळेच्या वेळेत शिष्यवृत्तीचे अध्यापन करताना खेळ, गाणी घ्यायचे, पण सुट्टीच्या दिवशी जादा तास घेण्यासाठी आल्यानंतर सर्व प्रथम २० ते २५ मिनिटे खेळ घ्यायचे. मग वर्गात गेल्यानंतर अध्यापनाला सुरुवात करण्यापूर्वी ७ ते १० मिनिटांची ध्यानधारणा (मेडिटेशन) घ्यायचे. त्यामुळे विद्यार्थ्यांची उपस्थिती चांगली असायची. विद्यार्थी न थकता, न कंटाळता तासाला थांबायचे, बसून राहायचे. कधी-कधी विद्यार्थी २ ते २.५ कि.मी अंतरावरून यायचे. त्यांच्या मानसिकतेचाही विचार करायला लागायचा. सुट्टीच्या दिवशी सकाळी ७.३० ते दुपारी १.०० असा कालावधी असायचा. दिवाळीच्या सुट्टीतदेखील तास चालू होते. दातीर सरांनी दिवाळीच्या सुट्टीतही अध्यापन केले. शिष्यवृत्तीचे ज्यादा तासांचे अध्यापन करताना दिवाळीपर्यंत शिष्यवृत्तीचा अभ्यासक्रम पूर्ण करायचा आणि त्यानंतर फक्त प्रश्नपत्रिका सोडवून घेण्याचा सराव घ्यायचा व त्यावर चर्चा करणे, मागदर्शन करणे. प्रश्नपत्रिका सोडवायला सुरुवात केल्यानंतर फक्त बोर्डाच्या प्रश्नपत्रिका न सोडवता वेगवेगळ्या प्रकाशनाच्या प्रश्नपत्रिका सरावासाठी वापरण्यात आल्या. तसेच आदरणीय सीईओ साहेबांचा उपक्रम मिशन आरंभ अंतर्गत जिल्हा परिषद अहमदनगर यांनी

ज्या दहा प्रश्नपत्रिकांचा सराव घेतला. त्याचादेखील विद्यार्थ्यांना खूपच चांगला फायदा झाला, तसेच खाजगी परीक्षा 'मंथन पब्लिकेशन' या परीक्षेसाठीसुद्धा शाळेतील विद्यार्थ्यांना बसवण्यात आले. हे सर्व करत असताना मुलांना सतत प्रोत्साहन द्यायचे, विद्यार्थ्यांशी नेहमी सकारात्मक गोष्टींवर चर्चा करायचे. मागच्या वर्षीपेक्षा निकाल चांगला लागला पाहिजे. गुणवत्ता यादीत जास्तीत जास्त विद्यार्थी कसे येतील या दृष्टीने प्रयत्न केले. इयत्ता पाचवीच्या वर्गासाठी दातीर सरांचे विशेष सहकार्य व खूप मोलाची साथ मिळाली. त्याचप्रमाणे भोर सरांचेदेखील छान सहकार्य मिळाले.

अभ्यासातील सातत्य व जास्तीत जास्त प्रश्नपत्रिका सोडवून घेण्याचा सराव यामुळे शाळेने आपली यशाची परंपरा कायम राखत सन २०२३-२०२४ मध्ये उत्तुंग यश संपादन केले. तब्बल आठ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत आले आणि २८ विद्यार्थी चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाले. विद्यार्थ्यांनी फक्त स्पर्धापरीक्षेत उत्तम कामगिरी केली नसून क्रीडास्पर्धेतसुद्धा छान कामगिरी केली आहे. शाळेतील एका विद्यार्थिनीने १४ तालुक्यातून 'धावणे' या क्रीडाप्रकारात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवला.

शिक्षण विस्तार अधिकारी, केंद्रप्रमुख व मुख्याध्यापिका मॅडम यांचे सातत्याने प्रोत्साहन मिळत होते. शाळेच्या व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व सर्व सदस्य ठामपणे पाठीशी उभे राहिले. त्याचप्रमाणे कर्तव्यदक्ष सदस्य निसाळ सर यांनीदेखील खंबीर साथ दिली. शाळेतील सर्वच सहकारी शिक्षकांचे सहकार्य मिळाले व सर्वांत महत्त्वाचे विद्यार्थ्यांचे अभ्यासातील सातत्य व चिकाटी यामुळेच एवढे मोठे घवघवीत यश संपादन करता आले.


आज शाळेची प्रशस्त व सुसज्ज इमारत, स्वतंत्र ग्रंथालय, प्रयोगशाळा. संगणक कक्ष, विद्यार्थ्यांसाठी चालवलेले ग्राहक भांडार, प्रत्येक वर्गात स्मार्ट टिव्ही, व्हर्च्युअल क्लासरूम आदि सर्व भौतिक सुविधा उपलब्ध आहेत. शिक्षकांचे विशेष परिश्रम, जास्त वेळ देण्याची तयारी, शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष, सर्व सदस्य ग्रामस्थांचे सहकार्य यामुळे खाजगी शाळेच्या तुलनेत ही शाळा जिल्ह्यात सर्वच बाबतीत अव्वल आहे. केवळ बौद्धिक बाबींकडे लक्ष न देता स्पर्धात्मक, सांस्कृतिक, क्रीडा आदी सर्वच क्षेत्रात सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविणे याकडे शाळेचा विशेष कल आहे. स्वतः खेळाडू असल्यामुळे सकाळी खेळ, संध्याकाळी मनोरंजनात्मक गाणी त्यामुळे शिष्यवृत्ती परीक्षेचा अभ्यास करताना विद्यार्थ्यांवर कुठल्याही प्रकारचे दडपण आले नाही. आनंददायी वातावरणात हसतखेळत हे यश संपादन करता आले विशेष म्हणजे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची मुले जिल्हा गुणवत्ता यादीत आणता आली हा आयुष्यातील सर्वांत आनंदाचा क्षण आहे !

**सुवर्णा जाधव**

**जि. प. प्राथ. शाळा कळस (बु.),**

**ता. अकोले, जि. अहमदनगर.**

# आदर्श शाळांच्या अनुषंगाने सुरू असणारे उपक्रम







09:00